


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक २४६ * नांदेड * सोमवार, दि. १४ सप्टेंबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

गोदातीर समाचार



**आज श्री गणेश चतुर्थी**

श्री गणेश चतुर्थीनिमित्त वाचक, जाहिरातदार, एजंटांसह सर्व गणेशभक्तांना हार्दिक शुभेच्छा!

–संपादक

## जरांगेंना पोलिसांनी परवानगी नाकारली

**मुंबई (प्रतिनिधी)–** मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबईत आंदोलन करण्याच्या मनसुब्यांना मुंबई पोलिसांनी मोठा झटका दिला आहे. मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईतील आझाद मैदानावर उपोषण करण्यासाठी पोलिसांकडे परवानगी मागितली होती. आपण सर्व अटी-शर्तींचे पालन करु, असेही त्यांनी सांगितले होते. तसे हमीपत्रही मनोज जरांगे यांनी पोलिसांना दिले होते. मात्र, आझाद मैदान पोलिसांनी १९ सप्टेंबरच्या मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला परवानगी नाकारली आहे. दक्षिण मुंबईतील सामान्य व्यवहार जसे शाळा, रुग्णालय, व्यवसाय, न्यायपालिका, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, सार्वजनिक आरोग्य बाधित होऊन सार्वजनिक सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण होणार असल्याने आझाद मैदान येथे आमरण उपोषण व आंदोलन करण्यास मागितलेली परवानगी नाकारत असल्याचे आझाद मैदान पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजू बिडकर यांनी पत्रात म्हटले आहे. आता पोलिसांकडून मनोज जरांगे यांना नोटीस पाठवून आंदोलन न करण्याबाबत बजावण्यात येईल.

**ठरल्याप्रमाणे उपोषण करू –जरांगे**

आम्ही संविधानाप्रमाणे चालतो. सरकारने कायदा पायदळी तुडवला तर न्यायालय न्याय देते. आम्ही सरकारच्या नियमांशी बांधील नाही. सरकारचे नियम आम्ही मानत नाही. द्वेष भावनेने परवानगी नाकारली आहे. मुंबईत आंदोलन जरांगे करू शकतात असं न्यायालय म्हणत असताना यातून द्वेष उफाळून येत आहे, गेल्यावर्षी देखील गणेशोत्सव होता. तरीही आम्ही शांततेत आंदोलन केलं. मिरवणूक गणेशोत्सवाची देखील होईल, ठरल्याप्रमाणे आम्ही उपोषण करू. आमचे वकील आजपासून कामाला लागतील, असंही पुढे जरांगेंनी म्हटलं आहे.

## आज लाडक्या बाप्पाचे आगमन; नांदेडची बाजारपेठ फुलली

**नांदेड (प्रतिनिधी)–** लाडक्या गणरायाचे आज जिल्ह्यात अत्यंत उत्साहात आणि मंगलमय वातावरणात आगमन होणार आहे. रविवारची सुट्टी साधत नांदेड शहरातील मुख्य बाजारपेठांमध्ये सजावट, पूजा साहित्य आणि गणेशमूर्ती खरेदीसाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. सार्वजनिक मंडळांसह घराघरातून बाप्पाच्या स्वागताची जय्यत तयारी पूर्ण झाली असून संपूर्ण शहर गणेशमय झाले आहे.

सकाळपासूनच इतवारा, सराफा लाईन, जुना मोंढा, आनंदनगर, श्रीनगर, शिवाजीनगर आणि सिडको परिसरातील दुकाने ग्राहकांनी गजबजली होती.




यंदा पर्यावरणपूरक मखर, रंगीबेरंगी विद्युत रोषणाई, कागदी आणि कापडी फुलांच्या सजावटीला मोठी पसंती मिळत आहे. दुर्वा, विड्याची पाने, नारळ, मोदकाचे साहित्य आणि सुवासिक फुलांच्या दुकानांवर मोठी गर्दी होती. घरगुती गणपतीसाठी नागरिकांनी सहकुटुंब कुंभारवाडा आणि विविध स्टॉल्सवरून मूर्ती खरेदी केल्या. अनेक सार्वजनिक मंडळांनी ढोल-ताशांच्या गजरात, गुलाल उधळत 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात बाप्पाला मंडपात आणले.

शहरातील मानाच्या मंडळांसह गल्लीबोळातील मंडळांनी भव्य देखावे आणि आकर्षक रोषणाईची तयारी पूर्ण केली आहे. घराघरात सुंदर मखर आणि आरास सजली असून आज शुभमुहूर्तावर मंत्रोच्चारात बाप्पाची प्रतिष्ठापना होणार आहे.

# सकल मातंग समाजाचा जनआक्रोश मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला

### २९ सप्टेंबरपर्यंत निर्णय घ्या, अन्यथा लाखोंच्या संख्येने मुंबईत मोर्चा काढण्याचा इशारा

**नांदेड (प्रतिनिधी)–** अनुसूचित जाती आरक्षणाचे वर्गीकरण तातडीने लागू करावे, या प्रमुख मागणीसाठी सकल मातंग समाजाच्या वतीने रविवारी (१३ सप्टेंबर) नांदेड शहरात भव्य जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. हजारो समाजबांधवांच्या उपस्थितीत निघालेला हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. महाराष्ट्र सरकारने २९ सप्टेंबरपर्यंत अनुसूचित जाती आरक्षणाच्या वर्गीकरणाचा निर्णय घ्यावा; अन्यथा राज्यातील लाखो समाजबांधवांना सोबत घेऊन मुंबईत भव्य मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला.

शहरातील डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास अभिवादन करून मोर्चाला सुरुवात झाली. त्यानंतर आयटीआय चौक, शिवाजीनगर, कला मंदिर, छत्रपती शिवाजी महाराज पुतळामार्गे मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर पोहोचला. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मोर्चाचे रूपांतर भव्य सभेत झाले. मोर्चामध्ये महिला, युवक, ज्येष्ठ नागरिकांसह मातंग समाजातील हजारो नागरिक सहभागी झाले होते.







सभेच्या व्यासपीठावर सावित्रीबाई साठे, सचिन साठे, माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे, लहुजी शक्ती सेनेचे विष्णू कसबे, आमदार सुनील कांबळे, आमदार जितेश अंतापूरकर, अजिंक्य चांदणे, सुकुमार कांबळे, गणपत भिसे, माजी आमदार सुधाकर भालेराव, माजी आमदार अविनाश घाटे, ॲड. राम चव्हाण, राजेश घोडे आदी मान्यवर उपस्थित होते.

सुप्रीम कोर्टाने अनुसूचित जातींच्या आरक्षणाच्या वर्गीकरणाबाबत राज्य सरकारांना अधिकार दिले आहेत. देशातील काही राज्यांमध्ये आरक्षणाचे वर्गीकरण लागू करण्यात आले आहे. मात्र, महाराष्ट्रात गेल्या काही महिन्यांपासून आरक्षण वर्गीकरणाचा प्रश्न प्रलंबित आहे. त्यामुळे मातंग समाजाच्या वतीने राज्यभर विविध आंदोलने, मोर्चे आणि जनजागृतीच्या माध्यमातून सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न सुरू आहे.

याच पार्श्वभूमीवर नांदेडमध्ये सकल मातंग समाजाच्यावतीने हा जनाक्रोश मोर्चा काढण्यात आला. यावेळी बोलताना सावित्रीबाई साठे यांनी मातंग समाजाची सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक परिस्थिती लक्षात घेता आरक्षणाचे वर्गीकरण होणे अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले. मातंग समाजातील शिक्षणाचे आणि नोकरीतील प्रतिनिधित्वाचे प्रमाण कमी असल्याने आरक्षणाचा लाभ समाजातील वंचित घटकांपर्यंत पोहोचण्यासाठी वर्गीकरण गरजेचे आहे, असे त्यांनी नमूद केले.

सचिन साठे यांनी आरक्षण वर्गीकरणाच्या मुद्द्यावरून राज्यात दोन समाजांमध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप केला. मातंग समाजातील महापुरुषांबद्दल आक्षेपार्ह विधाने केली जात आहेत. तसेच वैयक्तिक पातळीवर शिवीगाळ केली जात असल्याचा निषेध त्यांनी व्यक्त केला. अशा प्रकारांना यापुढे जशास तसे उत्तर दिले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला. 'वर्गीकरणाचा लढा कोणत्याही जातीच्या विरोधात नाही, तर सरकारच्या विरोधात आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाने दिलेल्या अधिकाराच्या आधारेच आम्ही आमचा लढा लढत आहोत,' असे सचिन साठे यांनी स्पष्ट केले.

**२९ सप्टेंबरपर्यंत निर्णय न झाल्यास मुंबईत लाखोंचा मोर्चा**

यावेळी विष्णू कसबे, आमदार कांबळे, आमदार जितेश अंतापूरकर, सुकुमार कांबळे, अजिंक्य भैय्या चांदणे आणि माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे यांनीही मनोगत व्यक्त केले. राज्य सरकारने अनुसूचित जाती आरक्षणाच्या वर्गीकरणाचा निर्णय तातडीने घ्यावा, अशी मागणी सर्व वक्त्यांनी केली. २९ सप्टेंबरपर्यंत सरकारने आरक्षण वर्गीकरणाचा निर्णय घेतला नाही, तर महाराष्ट्रातील सर्व मातंग समाजबांधवांना एकत्र करून मुंबईत लाखोंच्या संख्येने भव्य मोर्चा काढण्यात येईल, असा स्पष्ट इशारा यावेळी देण्यात आला.

मोर्चादरम्यान 'भीक नाही, वर्गीकरण आमचा हक्क', 'आरक्षणाचे वर्गीकरण झालेच पाहिजे' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. मोठ्या संख्येने समाजबांधव सहभागी झाल्याने जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात काही काळ मोठी गर्दी झाली होती.

## नांदेड पोलिसांची मध्यरात्री धडक मोहीम; ७५ सराईत गुन्हेगारांची झाडाझडती, २ फरार आरोपी जेरबंद

### पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने जिल्हाभर कोम्बिंग ऑपरेशन

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था सक्षम करण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशानुसार नांदेड जिल्हा पोलीस दलाने दि. १२ सप्टेंबर रोजी रात्री ११ ते दि. १३ सप्टेंबर पहाटे ३ वाजेपर्यंत संपूर्ण जिल्ह्यात विशेष कोम्बिंग ऑपरेशन राबविले. या कारवाईत ७५ सराईत आरोपींची झाडाझडती घेण्यात आली. तसेच २ फरार आरोपींना जेरबंद करण्यात आले आहे.

या मोहिमेत सराईत गुन्हेगार, अवैध शस्त्र बाळगणारे, हद्दपार-तडीपार, हिस्ट्रीशीटर, तसेच पाहिजे व फरारी आरोपींची सखोल तपासणी करण्यात आली.

कारवाईत तपासलेले तडीपार / प्रस्तावित तडीपार गुन्हेगार -६१, एमपीडीएमधून सुटलेले तपासलेले गुन्हेगार -२५, मालमत्ता व शरीराविरुद्धचे सराईत गुन्हेगार तपासणी -७५, पाहिजे / फरारी आरोपी अटक -२, कलम १२२ महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये गुन्हे दाखल -४, वॉरंट बजावणी - बेलेबल २५, नॉन-बेलेबल २ आरोपी न्यायालयात हजर व ५४ जणांना समन्स बजाविण्यात आला आहे.

या दरम्यान संशयास्पदरित्या फिरणाऱ्या ४ जणांविरुद्ध कलम १२२ महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या विशेष मोहिमेत अपर पोलीस अधीक्षक सूरज गुरव, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व ठाणे प्रभारी, स्थानिक गुन्हे शाखा व आरसीपी पथकाने सहभाग घेतला. सराईत गुन्हेगार व कायदा व सुव्यवस्थेला बाधा आणणाऱ्यांविरुद्ध अशा मोहिमा यापुढेही सुरूच राहतील, असा इशारा पोलीस अधीक्षकांनी दिला आहे.

## भाषा-संस्कृती जपणारे राष्ट्र कधीही गुलाम होत नाही –अमित शाह

**मुंबई (प्रतिनिधी)–** आपली भाषा, संस्कृती, स्मृती, इतिहास, संस्कार, अभिलेख आणि परंपरांचे रक्षण करता आले नाही, तर एखादा देश कितीही शक्तिशाली असला तरी त्याला संपायला वेळ लागत नाही. मात्र, या वारशाचे जतन करणाऱ्या देशाला कितीही वर्षे गुलाम ठेवले तरी त्याला पूर्णपणे गुलाम करता येत नाही, असे प्रतिपादन केंद्रीय गृह व सहकारमंत्री अमित शाह यांनी रविवारी मुंबईत केले.

एशियाटिक सोसायटीला भेट देणारे पहिले केंद्रीय गृहमंत्री असल्याचे सांगताना शाह यांनी आपण येथे गृहमंत्री म्हणून नव्हे, तर भारतीय ज्ञानपरंपरा हजारो वर्षे पुढे नेण्याच्या चळवळीतील एक कार्यकर्ता म्हणून आलो असल्याचे सांगितले. भारतीय ज्ञानपरंपरेची वाहक म्हणून एशियाटिक सोसायटीने हे ज्ञान देशभर पोहोचवावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.



भारतीय ज्ञानपरंपरा नष्ट करण्याचे अनेकांनी प्रयत्न केले, मात्र ते यशस्वी झाले नाहीत, असे शाह म्हणाले. नालंदेचे ग्रंथालय जाळता येऊ शकते; मात्र स्मृती आणि श्रुतीच्या माध्यमातून लोकांच्या मनात रुजलेले ज्ञान नष्ट करता येत नाही, असे उदाहरण त्यांनी दिले. पराभव झाला तरी धैर्याने पुढे जाणे आणि विजय मिळाल्यानंतर पराभूत झालेल्यांच्या स्मृती नष्ट न करता त्यांना आपल्या परंपरेशी जोडण्याचा प्रयत्न करणे हा भारताचा संस्कार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

## मराठा आरक्षणासाठी मुंबईतील उपोषणात नांदेड जिल्ह्याने सहभाग नोंदवावा; सकल मराठा समाजाचे आवाहन


**नांदेड (प्रतिनिधी)–** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील हे मुंबईतील आझाद मैदानावर आमरण उपोषणास बसणार असून, या आंदोलनात नांदेड जिल्ह्यातील मराठा समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सकल मराठा समाज, नांदेडच्यावतीने रविवारी आयोजित पत्रकार परिषदेत करण्यात आले.

मराठा समाजाला आरक्षण मिळावे आणि आरक्षणाचा प्रश्न राज्य सरकारने तातडीने सोडवावा, या प्रमुख मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी यापूर्वी अंतरवाली सराटी येथे आंदोलन केले होते. आता या मागणीसाठी ते मुंबईच्या आझाद मैदानावर आमरण उपोषण करणार आहेत.

या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर दि. १५ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता अंतरवाली सराटी येथून मराठा समाज बांधव मुंबईकडे रवाना होणार आहेत. ही पदयात्रा बीड, अहिल्यानगर, पुणे (हडपसर) आणि रायगड जिल्ह्यातील खोपोली येथे मुक्काम करत मुंबईत पोहोचणार आहे. पाचव्या दिवशी सकाळी १० वाजता आझाद मैदानावर आमरण उपोषणाला सुरुवात होणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

मराठा समाजाच्या प्रलंबित मागण्यांसाठी लोकशाही आणि संविधानिक मार्गाने सुरू असलेल्या या लढ्यात सर्वांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. तसेच मनोज जरांगे पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार आंदोलन शांततेत, संयमाने आणि संविधानिक चौकटीत राहून करावे, असेही सांगण्यात आले.

यावेळी नांदेड जिल्ह्यातील सर्व १६ तालुक्यांतील मराठा समाज बांधव, महिला, युवती आणि ज्येष्ठ नागरिकांनी आपले एकीचे बळ दाखवत जबाबदारीने या आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात आले. या पत्रकार परिषदेला मराठा आंदोलनाचे समन्वयक श्याम वडजे पाटील, सुचिता वडजे पाटील, गिरीश जाधव, राजेश मोरे, भगवान कदम हे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.




## अर्धापूर येथे शेतकरी पुत्रांची दुष्काळी दहीहंडी

### सुकलेले सोयाबीन-कापसाचा काला

**अर्धापूर/ नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात सत्ताधारी भाजप, राष्ट्रवादी आणि शिंदे सेनेकडून लाखो रुपयांची उधळण करीत दहिहंडीचा जल्लोष सुरू असताना, दुसरीकडे पावसाअभावी करपलेल्या शेतीकडे लक्ष वेधण्यासाठी शेतकरी पुत्रांनी रविवार, दि. १३ सप्टेंबर भोकर फाटा ता. अर्धापूर येथे दुष्काळी दहीहंडी फोडून सत्ताधाऱ्यांच्या उत्सवी दिखाव्याला चपराक दिली.

अर्धापूर तालुक्यातील भोकर फाटा येथे सकाळी ११ वाजता शेतकरी व त्यांच्या पुत्रांनी एकत्र येत शेतातील सुकलेले सोयाबीन, कापूस आणि खराब झालेल्या केळींचा काला करून दहीहंडी साकारली. 'पाऊस पडू दे, शेतकरी वाचू दे' अशी आर्त हाक देत श्रीकृष्णाला साकडे घालण्यात आले. राजकीय दहीहंडीतील अश्लील नाच-गाण्यांमुळे महाराष्ट्राच्या संस्कृतीचे अधःपतन होत असल्याबद्दलही यावेळी तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने दुष्काळ जाहीर करून मदत द्यावी, १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त छत्रपती संभाजीनगर येथे मंत्रिमंडळ बैठक घ्यावी, मराठवाड्याचा अनुशेष भरून काढावा, संपूर्ण कर्जमाफी करावी, वैधानिक विकास महामंडळाचे पुनर्गठन करून अध्यक्ष नेमावा, पीकविम्याबाबत तातडीने निर्णय घ्यावा आणि मराठवाड्याला कायमस्वरूपी दुष्काळमुक्त करावे, अशा मागण्या करण्यात आल्या.

या आंदोलनात शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष हनुमंत पाटील राजेगोरे, काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख, संदीपकुमार देशमुख, सुनील वानखेडे, सदाशिवराव देशमुख, दादाराव पुयड, पिंटू पाटील वासरीकर, शेतकरी नेते संतोष गव्हाणे, दीपक मगर, भगवानराव मनूरकर, शंकरराव राजेगोरे, मधुकर राजेगोरे, मारोतराव भांगे, भगवान पवार, किसनराव कदम, अशोक बुटले, बाळासाहेब आंबेगावकर, डॉ. उत्तमराव इंगळे, सदाशिव इंगळे, नितेश लोणे, विठ्ठल कल्याणकर, महेश राजेगोरे आदी उपस्थित होते.

**मुख्यमंत्र्यांना पत्र**

मराठवाड्यात मंत्रिमंडळ बैठक घेऊन दुष्काळी उपाययोजनांना गती द्यावी आणि वैधानिक विकास महामंडळाचे पुनर्गठन करावे, अशी मागणी हनुमंत राजेगोरे, प्रताप देशमुख व संदीपकुमार देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्राद्वारे केली आहे.

## २४३ प्रवाशांना घेऊन जाणारी बोट बेपत्ता, ६ जणांचा मृत्यू

**जकार्ता (प्रतिनिधी)–** इंडोनेशियाच्या जावा समुद्रात खराब हवामानामुळे एक प्रवासी बोट बेपत्ता झाल्याची घटना घडली आहे. आतापर्यंत सहा जणांचा मृत्यू झाला असून, ९७ जणांना वाचवण्यात यश आले आहे. उर्वरित प्रवाशांचा शोध सुरू आहे. 'व्हर्गो ट्रान्सपोर्ट ८' या फेरीमध्ये एकूण २४३ लोक प्रवास करत होते.

मिळालेल्या माहितीनुसार, हे जहाज शनिवारी सकाळी साडेदहा वाजतासुरबाया येथून दक्षिण कालीमंतनमधील बंजारमासिनसाठी निघाले होते. ते रविवारी दुपारी २ वाजता बंजारमासिनला पोहोचणार होते. रविवारी रात्री सुमारे २ वाजता फेरीशी संपर्क तुटला. त्यावेळी फेरी बांजरमासिनच्या दक्षिणेला सुमारे १५० किलोमीटर अंतरावर होती. अधिकाऱ्यांना मदतीसाठी पहिला फोन पहाटे ४ वाजून १० मिनिटांनी जहाजाची ऑपरेटर कंपनी, पीटी व्हर्गो कडून आला, ज्यांनी खराब हवामानामुळे जहाज अडचणीत असल्याचे कळवले.

# ऐतिहासिक वारसा हीच आपल्या सांस्कृतिक अस्मितेची ओळख -प्राचार्य डॉ. किशोर गंगाखेडकर

## प्रतिभा निकेतन महाविद्यालयाचा 'बंदा घाट ते नाव घाट' हेरिटेज वॉक उत्साहात



**नांदेड (प्रतिनिधी)** –विद्यार्थ्यांना स्थानिक इतिहासाची प्रत्यक्ष अनुभूती मिळावी, ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाची ओळख व्हावी तसेच वारसा संवर्धनाची जाणीव निर्माण व्हावी, या उद्देशाने प्रतिभा निकेतन महाविद्यालय, नांदेड येथील इतिहास विभागाच्या वतीने 'बंदा घाट ते नाव घाट' हेरिटेज वॉकचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

हेरिटेज वॉकचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किशोर गंगाखेडकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना त्यांनी ऐतिहासिक वारसा हीच आपल्या सांस्कृतिक अस्मितेची ओळख असून, या वारशाचे जतन व संवर्धन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन केले. विद्यार्थ्यांनी आपल्या परिसरातील ऐतिहासिक स्थळांचा अभ्यास करून त्यांचे महत्त्व जाणून घ्यावे, असे आवाहनही त्यांनी केले.

उद्घाटनपर कार्यक्रमाचे प्रास्ताविक इतिहास विभागप्रमुख डॉ. राहुल वरवंटीकर यांनी केले. हेरिटेज वॉकच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना नांदेड शहराच्या ऐतिहासिक, धार्मिक आणि सांस्कृतिक वारशाचा प्रत्यक्ष परिचय करून देण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

या हेरिटेज वॉकदरम्यान विद्यार्थ्यांनी बंदा घाट, नगिना घाट, घागर कुंड, भजनगड, रामघाट, शनी मंदिर, गोदावरी मंदिर, संत बाळगीर महाराज मठ, बडी दर्गा आणि नंदगिरी किल्ला आदी ऐतिहासिक, धार्मिक व सांस्कृतिक स्थळांना भेट दिली. या स्थळांचे ऐतिहासिक महत्त्व, धार्मिक परंपरा तसेच नांदेडच्या सांस्कृतिक जडणघडणीतील त्यांचे योगदान याविषयी विद्यार्थ्यांनी माहिती जाणून घेतली.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना पुस्तकातील इतिहास आणि प्रत्यक्ष ऐतिहासिक वारसा यांची सांगड घालण्याची संधी मिळाली. ऐतिहासिक स्थळांचे निरीक्षण, त्यांचे महत्त्व समजून घेणे आणि वारसा संवर्धनाची गरज जाणून घेणे, या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाच्या अभ्यासाबद्दल अधिक उत्सुकता निर्माण झाली.

या हेरिटेज वॉकमध्ये उपप्राचार्य डॉ. दिलीप स्वामी, डॉ. निळकंठ पाटील, डॉ. श्रीमंत राऊत, डॉ. मारुती लुटे, डॉ. स्वाती तांडे, डॉ. जयश्री देशमुख, डॉ. ममता मालविया, महाविद्यालयाचे अधीक्षक राजेश अय्यंगार, डॉ. पराग साले, डॉ. कोमल काळबांडे, प्रा. रवी चव्हाण यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

आपला इतिहास जाणून घेऊया, आपला वारसा जपूया या भावनेतून आयोजित करण्यात आलेला हा हेरिटेज वॉक विद्यार्थ्यांमध्ये ऐतिहासिक जाणीव, सांस्कृतिक अभिमान आणि वारसा संवर्धनाची जबाबदारी निर्माण करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरला. इतिहास विभागाच्या या अभिनव उपक्रमाचे उपस्थित मान्यवर, प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी कौतुक केले.

# स्वारातीम विद्यापीठात भित्तीपत्रक, रांगोळी स्पर्धा व ग्रंथप्रदर्शनाचे कुलगुरूंच्या हस्ते उद्घाटन



**नांदेड (प्रतिनिधी)**– स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात मराठवाडा मुक्ती संग्राम आणि विद्यापीठ वर्धापन दिनाचे औचित्य साधून ज्ञान स्रोत केंद्र व विद्यार्थी विकास विभागाच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठस्तरीय भित्तीपत्रक, रांगोळी स्पर्धा आणि ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. मराठवाडा मुक्ती संग्रामाचा वैभवशाली इतिहास आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा गत ३२ वर्षांचा प्रवास हा या स्पर्धा व प्रदर्शनाचा मुख्य विषय होता. या त्रिविध कार्यक्रमाचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते फीत कापून अत्यंत उत्साहात करण्यात आले.

या विद्यापीठस्तरीय स्पर्धे-साठी विद्यापीठ परिक्षेत्रातील नांदेड, लातूर, परभणी आणि हिंगोली या चारही जिल्ह्यातील विविध वरिष्ठ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यामध्ये रांगोळी स्पर्धेत १८ तर भित्तीपत्रक स्पर्धेत २९ स्पर्धकांनी सहभाग नोंदवत आपल्या कलागुणांचे सादरीकरण केले. या स्पर्धांच्या परीक्षणाची जबाबदारी डॉ. वैजयंता पाटील, डॉ. सुनिता पाटील, डॉ. रुपाली जैन, डॉ. दीपाली साबळे, डॉ. पी. विठ्ठल, डॉ. वैजनाथ अनमुलवाड आणि डॉ. उषा सांगळे यांनी अत्यंत पारदर्शकपणे पार पाडली.

उद्घाटन प्रसंगी ज्ञान स्रोत केंद्राचे प्र. संचालक डॉ. जगदीश कुलकर्णी, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मारोती गायकवाड आणि अधिसभा सदस्य शिवाजी चांदणे यांची प्रमुख उपस्थिती होती. याशिवाय विविध महाविद्यालयांमधून आलेले संघप्रमुख, प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, संशोधक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजनात डॉ. अरुण हंबर्डे, संदीप डहाळे व विठ्ठल मोरे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली, तर के. एस. सिद्दिकी, मोहनसिंग पुजारी, माधव लुटे, प्रमिला बडगे, नितीन राठोड, दयानंद पोपळे, तिरुपती हंबर्डे व योगेश हंबर्डे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# रुग्णांच्या आरोग्याशी तडजोड सहन केली जाणार नाही : आ. बोंढारकर यांचा इशारा



**नांदेड (प्रतिनिधी)**– विष्णुपुरी येथील शासकीय रुग्णालयातील अतिदक्षता विभागात गेल्या दोन-तीन दिवसांपासून एसी बंद असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. याची माहिती मिळताच आमदार आनंदराव बोंढारकर यांनी तत्काळ रुग्णालयात पोहोचून प्रत्यक्ष पाहणी केली. रुग्णांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही, असा सक्त इशारा त्यांनी वैद्यकीय अधिकाऱ्यांना दिला.

**एसी दुरुस्ती व स्वच्छतेचे तातडीने आदेश**

आयसीयू विभागात नवजात बालकांवर उपचार सुरू असताना तापमान नियंत्रण अत्यंत महत्त्वाचे असते. एसी बंद असल्याने उकाड्याचा त्रास होत असल्याच्या तक्रारी रुग्णांच्या नातेवाईकांनी केल्या होत्या. आमदारांनी नातेवाईकांशी संवाद साधून अडचणी जाणून घेतल्या आणि अधिकाऱ्यांना धारेवर धरत एसी तातडीने दुरुस्त करण्याचे आदेश दिले.

तसेच पाहणीदरम्यान स्वच्छतागृहांची अस्वच्छता आणि बेडशीटची दुरवस्था दिसून आली. रुग्णांना स्वच्छ व सुरक्षित वातावरण देणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचे सांगत, स्वच्छता व्यवस्था सुधारण्याच्या कडक सूचना त्यांनी दिल्या. रुग्णसेवेत हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही, अशी ताकीदही त्यांनी दिली.

# लोह्यात कुणबी प्रमाणपत्रासाठी महसूल मंडळनिहाय विशेष शिबिरे

**नांदेड (प्रतिनिधी)**– कुणबी प्रमाणपत्रासाठी आवश्यक कागदपत्रे, नोंदी व पुरावे सादर करता यावेत, तसेच प्रमाणपत्र वितरणाची कार्यवाही सुलभ व्हावी, यासाठी लोहा तालुक्यात दि. १७ सप्टेंबरपर्यंत महसूल मंडळ स्तरावर विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या निर्देशानुसार आयोजित या शिबिरांमध्ये मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी व सहायक कृषी अधिकारी यांच्या संयुक्त पथकाद्वारे कुणबी नोंदी शोधणे, पुराव्यांची पडताळणी करणे, अर्ज स्वीकारणे तसेच पात्र लाभार्थ्यांना प्रमाणपत्र वितरित करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

# चिमुकल्यांच्या हातून साकारला पर्यावरणपूरक गणराय

## कै. नानाजी पालकर शाळेत गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**नांदेड (प्रतिनिधी)** –गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत सन्मित्र फाउंडेशन, सरस्वती प्रतिष्ठाण आणि कै. नानाजी पालकर शाळेच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. शाळेतील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी मोठ्या संख्येने सहभागी होत कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी शाडू मातीपासून लहान, सुबक आणि आकर्षक गणेशमूर्ती स्वतःच्या हाताने साकारल्या. गणेशमूर्ती तयार करण्याच्या प्रक्रियेत विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांना आणि कल्पकतेला वाव देत पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेशही दिला. चिमुकल्यांनी तयार केलेल्या गणेशमूर्तींपैकी एक सुंदर मूर्ती शाळेला भेट देण्यात आली.



यावेळी उपस्थित मान्यवरांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचे महत्त्व आणि जलप्रदूषण रोखण्यासाठी शाडू मातीच्या गणेशमूर्तींचा वापर करण्याची गरज विद्यार्थ्यांना समजावून सांगितली. गणेशोत्सव हा श्रद्धेचा आणि आनंदाचा उत्सव असतानाच पर्यावरण संवर्धनाची जबाबदारीही प्रत्येकाने स्वीकारली पाहिजे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

आजच्या काळात प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींमुळे होणारे जलप्रदूषण आणि पर्यावरणावरील दुष्परिणाम टाळण्यासाठी पर्यावरणपूरक गणेशमूर्तींचा वापर करणे काळाची गरज आहे. लहान वयातच विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण व्हावी, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

कार्यशाळेसाठी आवश्यक असलेली शाडू माती तसेच इतर साधनसामग्री सन्मित्र फाउंडेशन आणि सरस्वती प्रतिष्ठाण यांच्या वतीने उपलब्ध करून देण्यात आली. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत गणेशमूर्ती तयार केल्याने संपूर्ण कार्यशाळेला उत्साहाचे वातावरण लाभले.

या प्रसंगी डॉ. दि.भा. जोशी, श्रुती देशपांडे, कल्पना कांबळे, मोहिनी जोशी आदी मान्यवर उपस्थित होते.

# भाजपा किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष रामकृष्ण वेताळ यांचे नांदेडमध्ये स्वागत



**नांदेड (प्रतिनिधी)**– भारतीय जनता पार्टी किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष रामकृष्ण वेताळ यांचे शनिवार, दि. १२ सप्टेंबर रोजी नांदेड येथे आगमन झाले असता शासकीय विश्रामगृह येथे त्यांचा सत्कार करण्यात आला.

भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य दत्ता शेंबाळे फुलवळकर यांच्या वतीने हा सत्कार करण्यात आला. लोहा- कंधारच्या परंपरेप्रमाणे खारीक-खोबऱ्याचा हार, शाल आणि पुष्पगुच्छ देऊन वेताळ यांचे स्वागत करण्यात आले.

रामकृष्ण वेताळ हे लातूर- नांदेड मार्गे पूर्वनियोजित विदर्भ दौऱ्यावर जात असताना नांदेड येथे मुक्कामी होते. यावेळी त्यांनी पक्षवाढ, संघटन, विचारधारा आणि पक्षाची भूमिका व ध्येयधोरणांबाबत पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली. केंद्र व राज्य सरकारच्या पीएम किसान, नमो शेतकरी सन्मानचे हप्ते, कर्जमाफी आणि शेतकरी हिताच्या निर्णयांवर त्यांनी विचार मांडले. किसान मोर्चाकडून शेतकऱ्यांसाठी सुरू असलेल्या विशेष प्रयत्नांचाही त्यांनी उल्लेख केला.

# गणेशोत्सव: राज्य महोत्सवात महावितरणकडून होणार हरितऊर्जा, विद्युत सुरक्षा व बचतीवर जनजागृती

**नांदेड (प्रतिनिधी)**– राज्यात गणेशोत्सव हा राज्य महोत्सव म्हणून घोषित करण्यात आला आहे. शासनाच्या विविध विभागाद्वारे गणेशोत्सवात समाजजागृतीपर कार्यक्रम होणार आहेत. महावितरणच्या नांदेड परिमंडलातील नांदेड, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यातही व्यापक प्रमाणात गणेशोत्सव हा राज्यमहोत्सव म्हणून साजरा करण्यात येणार असून, त्यात वीज सुरक्षा, हरित ऊर्जा आणि वीज बचतीच्या संकल्पनेवर भर देण्यात येणार आहे.

१४ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर या काळात परिमंडलातील तीनही जिल्ह्यात हरित उर्जा, विद्युत सुरक्षा आणि वीज बचत या संकल्पनेवर जनजागृती होईल. महोत्सवाची सुरूवात १५ सप्टेंबर या अभियंता दिनाने होईल. अभियंता दिनी सर्व अभियंत्यांचा व त्यांच्या रचनात्मक कार्याचा सन्मान करण्यात येईल. त्या सोबतच महावितरणचे सर्व अभियंते, अधिकारी आणि कर्मचारी त्या त्या भागातील नामांकित शाळा व महाविद्यालयात जाऊन समारंभपूर्वक हरित ऊर्जा, विद्युत सुरक्षा आणि वीज बचत या विषयांवर विद्यार्थ्यांचे प्रबोधन करतील. शिवाय जिल्हा, तालुका व गावपातळीवरील गणेश मंडळाच्या मंडपातही जाऊन जनजागृती करण्यात येणार आहे.

हतितऊर्जा विकासाला प्राधान्य देणारी प्रधानमंत्री मोफत सौरघर योजना, शेतीपंपासाठीची मागेल त्याला सौरकृषीपंप योजना, शेतीला दिवसाच्या कालावधीत वीज पुरवठ्यास महत्वपूर्ण ठरणारी मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजना, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी असणारी स्मार्ट सौरघर योजनांचा जागर करणारे बॅनर्स, होर्डीग्ज, पॉम्पलेट गणेश महोत्सवात उपलब्ध होणार आहेत. त्या शिवाय वीज सुरक्षेसाठी काय करावे आणि काय करू नये यासंबंधीची माहिती विविध गणेश मंडळाच्या मंडपा-मंडपातून देण्यात येणार आहे.

गणेशोत्सव हा राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्यासंदर्भात राज्य शासनाने शासनाच्या इतर विभागांसह महावितरणलाही त्यासंबंधीचे दिशा निर्देश परिपत्रकातून देण्यात आलेले आहे. त्यानुसार महावितरणच्या नांदेड शहर, नांदेड ग्रामीण, भोकर, देगलूर, परभणी, सेलू आणि हिंगोली विभागाकडून जनजागृती करण्यासाठी कार्यक्रमांची आखणी करण्यात आलेली आहे.

# नांदेड जिल्हा कोरडा दुष्काळ जाहीर करण्याची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाडयात यंदा पावसाने मोठी ओढ दिल्याने खरीप हंगामातील पिके धोक्यात आली आहेत. ऑगस्ट महिन्यात तब्बल महिनाभर पावसाचा खंड पडल्यामुळे शेतकऱ्याच्या पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानीचे तातडीने पंचनामे करुन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी, तसेच मराठवाड्यात कोरडा दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी शिवसेना शिव उद्योग सहकार सेनेचे नांदेड जिल्हाध्यक्ष विनोद वंजारे व नांदेड शहराध्यक्ष बलसेटवार यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात निवासी उपजिल्हाधिकारी किरण आंबेकर यांच्या कडे निवेदनाद्वारे केली आहे.

शिवसेना पक्षाच्या शिव उद्योग सहकार सेनेचे प्रदेशाध्यक्ष रामेश्वर वाडेकर यांच्या वतीने मंत्रालयातील दालनात कृषी, मदत व पुनर्वसन, अर्थ व नियोजन तसेच कामगार कल्याण राज्यमंत्री आशीष जैस्वाल यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा करण्यात आली. याबाबतचे लेखी निवेदन मंत्र्यांना दिले. नांदेड जिल्ह्यासह मराठवाड्यात कमी पर्जन्यमानामुळे कापूस, सोयाबीन, तूर, मूग, उडीद, मका यासह विविध खरीप पिकावर गंभीर परिणाम झाला आहे. ऑगस्ट महिण्यात पावसाचा दीर्घ खंड पडल्याने अनेक भागात पिके सुकण्याच्या अवस्थेत असून शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट निर्माण झाले आहे. त्यामुळे प्रशासनाने प्रत्यक्ष शेतपातळीवर जाऊन वस्तुनिष्ठ पंचनामे करावेत आणि नुकसानीच्या प्रमाणात तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी करण्यात आली.

या मागण्यावर राज्यमंत्री आशीष जैस्वाल यांनी सकारात्मक भूमिका घेत वस्तुनिष्ठ अहवाल मागवून त्यानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन दिले.

# तीन वर्षांत ४ हजार ९०४ कुणबी प्रमाणपत्रे; अडीच वर्षांत ४० हजार ९०१ एसईबीसी प्रमाणपत्रांचे वितरण

**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड जिल्ह्यातील पात्र नागरिकांना कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी तसेच एसईबीसी जात प्रमाणपत्रे सुलभतेने उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत प्रभावी कार्यवाही सुरू आहे. न्यायमूर्ती संदीप शिंदे (निवृत्त) समितीच्या माध्यमातून जिल्ह्यातील १०६ गावांमध्ये १ हजार ७५२ कुणबी नोंदी आढळून आल्या आहेत.

या नोंदींच्या आधारे दि. २४ ऑक्टोबर २०२३ ते ११ सप्टेंबर २०२६ या कालावधीत कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी प्रमाणपत्रांसाठी ४ हजार ९३० अर्ज प्राप्त झाले. त्यापैकी ४ हजार ९०४ प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली असून, विहित पुराव्याअभावी केवळ १६ प्रस्ताव नामंजूर करण्यात आले आहेत, तर १० प्रस्ताव छाननी प्रक्रियेत आहेत. प्रमाणपत्र मंजुरीचा दर ९९.५१ टक्के आहे.

तसेच कुणबी नोंद नसली, मात्र मराठा अशी नोंद असलेल्या पात्र नागरिकांना १० टक्के मराठा एसईबीसी आरक्षणासाठी प्रमाणपत्रे देण्यात येत आहेत. दि. १ एप्रिल २०२४ ते ११ सप्टेंबर २०२६ या कालावधीत जिल्ह्यात ४० हजार ९०१ एसईबीसी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले आहे.

जात प्रमाणपत्र मिळविण्याची प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी दि. १० ते १७ सप्टेंबर २०२६ या कालावधीत प्रत्येक महसूल मंडळ स्तरावर विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरांमध्ये विहित नमुन्यातील अर्ज उपलब्ध करून देणे व अर्ज भरून घेण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. पूर्ण भरलेला अर्ज जवळच्या महा-ई-सेवा केंद्र किंवा सामाईक सुविधा केंद्रामध्ये सादर करण्यासाठी अर्जदारांना मदत करण्याचे निर्देश ग्रामसेवक, तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

प्राप्त अर्जांवर प्राधान्याने कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधित तहसीलदार व सक्षम प्राधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. नागरिकांनी आपल्या महसूल मंडळात आयोजित विशेष शिबिरांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. पात्र नागरिकांना जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्र मिळविताना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी तसेच प्रक्रिया पारदर्शक व गतिमान करण्यासाठी उपजिल्हाधिकारी अजय शिंदे यांची जिल्हास्तरावर नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

# पुयनी येथील विठ्ठल पावडे यांना वनस्पतीशास्त्र विषयात पीएच. डी. प्रदान



**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील यशवंत महाविद्यालय नांदेड या महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागातील संशोधक विद्यार्थी विठ्ठल आनंदराव पावडे यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातर्फे वनस्पतीशास्त्र या विषयामध्ये नुकतीच पीएच.डी. प्रदान करण्यात आली.

त्यांनी स्टडीज ऑन अँटिमाईक्रोबियल प्रॉपर्टीज ऑफ अप्पोसायनसी मेंबर्स फ्रॉम मराठवाडा रिजन या विषयावर संशोधन केले आहे. त्यांनी डॉ.सुरेश तेलंग यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधनकार्य पूर्ण केले आहे. तसेच त्यांना यशवंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे यांचे प्रोत्साहन लाभले.

वनस्पतीशास्त्र विभागातील विभाग प्रमुख प्रो.डॉ. एम. एम. व्ही. बेग, प्रो. डॉ. साहेब एल. शिंदे, प्रा. डॉ. सचिन पाटील यांचे सहकार्य लाभले. त्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयाच्या वतीने आणि नेत्ररोग तज्ज्ञ डॉ.श्याम पाटील तेलंग, डॉ.वडजे, प्रा. धनंजय, प्रा. डॉ. व्यंकटी पावडे, नागोराव पाटील चिमेगावकर, पंजाबराव पाटील, गोविंदराव पाटील आढाव आदींनी अभिनंदन केले.

# नांदेड महानगरात ठाकरे गटाची खलबते; गटनिहाय पक्षबांधणीवर भर

**नांदेड (प्रतिनिधी)**–आगामी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाची महत्त्वाची आढावा बैठक नूतन लोकसभा संपर्कप्रमुख किशोर पोद्दार यांच्या अध्यक्षतेखाली येथील शासकीय विश्रामगृहावर संपन्न झाली.

या बैठकीत महानगरपालिका हद्दीतील प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या आतापर्यंतच्या कामाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. आगामी काळात पक्षाची संघटनात्मक पकड मजबूत करणे, नूतन पदाधिकाऱ्यांची निवड करणे आणि गटनिहाय (प्रभागनिहाय) पक्षबांधणीवर विशेष भर देणे, याबाबत संपर्कप्रमुख किशोर पोद्दार यांनी उपस्थित पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करत सक्रिय होण्याचे आवाहन केले.



यावेळी शिवसेनेचे मुख्य महानगरप्रमुख प्रकाश मारावार यांनी शहरातील राजकीय सद्य स्थिती आणि पक्षाच्या कामाची माहिती मांडली. तर जिल्हाप्रमुख भुजंग पाटील यांनी सर्व कार्यकर्त्यांनी आपापसातील मतभेद बाजूला ठेवून एकजुटीने काम करावे व पक्ष संघटना तळागाळापर्यंत पोहोचवावी, असे प्रतिपादन केले.

या आढावा बैठकीस उपजिल्हाप्रमुख विजय बगाटे, धोंडू पाटील, दक्षिण महानगरप्रमुख मनोज यादव, शहरप्रमुख जितू टाक, अर्जुन ठाकूर, नवज्योतसिंग गाडीवाले, गजानन हरकरे, ब्रिजलाल उगवे, राम चव्हाण, बंडू देशमुख, माधवराव कल्याणकर, दिलीप भांगिले, गणेश पेन्सलवार, मकसूद पटेल, सूरज फटाले, शहर प्रवक्ता नागनाथ माधापुरे, तुलसीदास नंदाने, मोहित पठाण, किरण देशमुख, नरेश राठी, संदीप जिल्हेवाड, शेख खाजाभाई, गोस भाई, युनूस भाई, अक्षय वट्टमवार, सौरभ देवकते, सचिन पाटील, गजानन देशमुख, आनंद वाघमारे, कलीम शेख, वसंत शिंदे यांच्यासह ठाकरे गटाचे शहरातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रगतीमंत्र

## बँक ऑफ इंडियामध्ये मॅनेजर, सीनियर मॅनेजर होण्याची संधी

**बँकिंग क्षेत्रात सरकारी नोकरीच्या शोधात असलेल्या उमेदवारांसाठी महत्त्वाची संधी उपलब्ध झाली आहे. सार्वजनिक क्षेत्रातील बँक ऑफ इंडिया (BOI) ने स्पेशालिस्ट ऑफिसरच्या विविध पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू केली आहे. या भरतीअंतर्गत ऑफिसर, मॅनेजर, सीनियर मॅनेजर आणि चीफ मॅनेजर या पदांवर नियुक्त्या केल्या जाणार आहेत.**




डिजिटल प्लॅटफॉर्म, सप्लाय चेन, ट्रेड फायनान्स टेक्नॉलॉजी, डिजिटल बँकिंग ऑपरेशन्स, माहिती तंत्रज्ञान, आयटी इन्फ्रास्ट्रक्चर, डेटाबेस प्रशासन, माहिती सुरक्षा आदी क्षेत्रांमध्ये ही भरती केली जाणार आहे. या भरतीद्वारे एकूण २०५ पदे भरली जाणार आहेत. बँक ऑफ इंडिया ही सार्वजनिक क्षेत्रातील बँक असल्याने बँकिंग क्षेत्रात उच्च पदावर नोकरी करू इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी ही चांगली संधी आहे. मात्र, प्रत्येक पदासाठी शैक्षणिक पात्रता, अनुभव आणि वयोमर्यादा वेगवेगळी आहे. त्यामुळे अर्ज करण्यापूर्वी उमेदवारांनी संबंधित पदाची पात्रता काळजीपूर्वक तपासणे आवश्यक आहे.

### वयोमर्यादा किती?

- ऑफिसर: २१ ते ३० वर्षे
- मॅनेजर: २५ वर्षे ते ३२-३५ वर्षांपर्यंत
- सीनियर मॅनेजर: २८ ते ३७- ४० वर्षांपर्यंत
- चीफ मॅनेजर: २८ ते ४२ वर्षांपर्यंत
- वयोमर्यादा संबंधित पदानुसार वेगळी असल्याने अर्ज करण्यापूर्वी अधिकृत अधिसूचना तपासणे महत्त्वाचे आहे.

### किती मिळणार पगार?

- निवड झालेल्या उमेदवारांना त्यांच्या पदाच्या वेतनश्रेणीनुसार मासिक वेतन मिळणार आहे.
- ज्युनियर मॅनेजमेंट ग्रेड स्केल-I: ४८,४८० ते ८५,९२०
- मिडल मॅनेजमेंट ग्रेड स्केल-II (MMGS-II): ६४,८२० ते ९३,९६०
- मिडल मॅनेजमेंट ग्रेड स्केल-III (MMGS-III): ८५,९२० ते १,०५,८२०
- सीनियर मॅनेजमेंट ग्रेड स्केल-IV (SMGS-IV): १,०२,३०० ते १,२०,९४०

### किती मिळणार पगार?

- निवड झालेल्या उमेदवारांना त्यांच्या पदाच्या वेतनश्रेणीनुसार मासिक वेतन मिळणार आहे.
- ज्युनियर मॅनेजमेंट ग्रेड स्केल-I: ४८,४८० ते ८५,९२०
- मिडल मॅनेजमेंट ग्रेड स्केल-II (MMGS-II): ६४,८२० ते ९३,९६०
- मिडल मॅनेजमेंट ग्रेड स्केल-III (MMGS-III): ८५,९२० ते १,०५,८२०
- सीनियर मॅनेजमेंट ग्रेड स्केल-IV (SMGS-IV): १,०२,३०० ते १,२०,९४०

| तपशील | माहिती |
|---|---|
| बँक | बँक ऑफ इंडिया (BOI) |
| पदे | ऑफिसर, मॅनेजर, सीनियर मॅनेजर, चीफ मॅनेजर |
| एकूण रिक्त जागा | २०५ |
| अर्जाची अंतिम तारीख | २५ सप्टेंबर २०२६ |
| निवड प्रक्रिया | छाननी, ऑनलाइन परीक्षा आणि मुलाखत |
| अधिकृत संकेतस्थळ | bankofindia.bank.in |

### शैक्षणिक पात्रता काय?

- चीफ मॅनेजर- फुल स्टॅक इंजिनिअरिंग या पदासाठी उमेदवाराकडे कॉम्प्युटर सायन्स, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी किंवा इलेक्ट्रॉनिक्स अँड कम्युनिकेशनमधील B.E./B.Tech., अथवा MCA/M.Sc. संबंधित पदवी असणे आवश्यक आहे. यासोबत OCP Java SE Programmer, Meta Front-End Developer Professional Certificate, MERN Stack Certification किंवा Certified Professional Python Programmer यांसारख्या संबंधित प्रमाणपत्रांपैकी आवश्यक प्रमाणपत्र असणे अपेक्षित आहे. तसेच संबंधित क्षेत्रातील ८ वर्षांचा अनुभव आवश्यक आहे.
- चीफ मॅनेजर- डिजिटल बँकिंग ऑपरेशन्स या पदासाठीही संबंधित अभियांत्रिकी किंवा पदव्युत्तर पदवीसोबत संबंधित व्यावसायिक प्रमाणपत्रे आणि ८ वर्षांचा अनुभव आवश्यक आहे.
- सीनियर मॅनेजर पदासाठी संबंधित क्षेत्रातील ५ वर्षांचा अनुभव, तर मॅनेजर पदासाठी संबंधित क्षेत्रातील ३ वर्षांचा अनुभव आवश्यक आहे.
- उमेदवारांनी ज्या पदासाठी अर्ज करायचा आहे, त्या पदाची सविस्तर शैक्षणिक पात्रता आणि अनुभवाची अट अधिकृत अधिसूचनेत तपासणे आवश्यक आहे.

### तीन टप्प्यांत निवड

- उमेदवारांची छाननी : उमेदवारांचा संबंधित व्यावसायिक अनुभव, आवश्यक प्रमाणपत्रे, शैक्षणिक पात्रता आणि इतर पात्रता निकषांच्या आधारे प्राथमिक स्तरावर विचार केला जाईल. पात्र उमेदवारांना पुढील टप्प्यासाठी निवडले जाईल.
- ऑनलाइन परीक्षा : ऑनलाइन परीक्षेत इंग्रजी भाषेसाठी २५ गुण आणि व्यावसायिक ज्ञानासाठी १०० गुण असतील. परीक्षेसाठी एकूण १०० मिनिटांचा कालावधी दिला जाईल. सामान्य आणि EWS प्रवर्गातील उमेदवारांना पात्र होण्यासाठी किमान ३५ टक्के गुण मिळवणे आवश्यक आहे. SC, ST, OBC आणि PwBD प्रवर्गातील उमेदवारांना यात ५ टक्के गुणांची सवलत देण्यात आली आहे. परीक्षेत प्रत्येक चुकीच्या उत्तरासाठी १/४ गुणांची नकारात्मक गुणपद्धती लागू असेल.
- मुलाखत : व्यावसायिक ज्ञानाच्या ऑनलाइन परीक्षेतील कामगिरीच्या आधारे पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावले जाईल. मुलाखतीसाठी स्वतंत्र गुणवत्ता यादी तयार केली जाईल.




### अर्ज शुल्क किती?

या भरतीसाठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया १० सप्टेंबर ते २५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत सुरू राहणार आहे. अर्ज भरताना निर्धारित शुल्कही जमा करावे लागेल.

- SC/ST/PwBD उमेदवार: १७५
- सामान्य/EWS/OBC उमेदवार: १,१८०
- या शुल्कामध्ये अर्ज शुल्क आणि माहिती देण्यासाठी आकारले जाणारे शुल्क समाविष्ट आहे.

### अर्ज कुठे करायचा?

इच्छुक आणि पात्र उमेदवारांनी २५ सप्टेंबर २०२६पूर्वी बँक ऑफ इंडियाच्या अधिकृत संकेतस्थळावरून ऑनलाइन अर्ज करावा. अर्ज करण्यापूर्वी संबंधित पदाची शैक्षणिक पात्रता, अनुभव, वयोमर्यादा आणि इतर अटी काळजीपूर्वक तपासाव्यात.

## गावातील मुलीच्या इंग्रजीची खिल्ली उडवली, तीच आज IAS अधिकारी!

**परीक्षेचे नाव घ्या आणि ती परीक्षा सुरभी गौतम यांनी उत्तीर्ण केलेली नसेल, असे कदाचित क्वचितच घडले असेल. मध्य प्रदेशातील एका छोट्याशा गावातून आलेल्या सुरभी यांच्या इंग्रजीची एकेकाळी खिल्ली उडवली जात होती. मात्र, त्यांनी त्याच कमतरतेला आपली ताकद बनवली. आज त्या केवळ IAS अधिकारी नाहीत, तर त्यांनी BARC, ISRO, GATE, SSC, दिल्ली पोलीस उपनिरीक्षक, PCS आणि UPSC Engineering Services यांसह अनेक स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण केल्या आहेत. इंजिनिअरिंगचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांना नामांकित IT कंपनी TCSमध्ये चांगल्या पगाराची नोकरी मिळाली. मात्र, प्रशासकीय सेवेत जाण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्यांनी ही नोकरी सोडली आणि UPSCची तयारी सुरू केली.**



### गावात जन्म; मोठे स्वप्न....

गावची मुलगी कशी असावी, तर सुरभी गौतमसारखी! अशा घोषणा देत ज्या मुलीचे नंतर गावात जल्लोषात स्वागत करण्यात आले, तिच्या जन्माच्या वेळी मात्र तिच्या आई-वडिलांव्यतिरिक्त फारसे कोणी आनंद व्यक्त केला नव्हता. सुमारे २५ वर्षांपूर्वी एका मोठ्या संयुक्त कुटुंबात तिचा जन्म झाला. तो दिवस कुटुंबासाठी इतर दिवसांप्रमाणेच साधा होता. मात्र, याच मुलीने पुढे आपल्या मेहनतीच्या, जिद्दीच्या आणि काहीतरी मोठे करण्याच्या इच्छाशक्तीच्या जोरावर संपूर्ण देशात आपली वेगळी ओळख निर्माण केली. सुरभी गौतम यांची यशोगाथा हे दाखवून देते की अडचणी कितीही मोठ्या असल्या, तरी मेहनत आणि सातत्याच्या जोरावर त्यांचे यशाच्या पायऱ्यांमध्ये रूपांतर करता येते.

### वडील वकील, आई शिक्षिका

सुरभी गौतम या मध्य प्रदेशातील सतना जिल्ह्यातील अमदरा या छोट्याशा गावातील सर्वसामान्य कुटुंबातून येतात. त्यांचा जन्म २१ ऑगस्ट १९९१ रोजी झाला. त्यांचे वडील वकील असून आई शिक्षिका आहेत. सुरभी यांचे शालेय शिक्षण गावातील सरकारी शाळेत झाले. ग्रामीण भागातून शिक्षण घेत शहरातील महाविद्यालयात पोहोचल्यानंतर त्यांनी अनेक आव्हानांचा सामना केला. मात्र, प्रत्येक अडचणीवर मात करत त्यांनी एकापाठोपाठ एक अनेक स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण केल्या.

### अशा बनल्या IAS अधिकारी



अनेक परीक्षा उत्तीर्ण करूनही सुरभी यांचे एक मोठे स्वप्न अद्याप बाकी होते, IAS अधिकारी होण्याचे. २०१६ मध्ये त्यांनी हे स्वप्नही पूर्ण केले. त्यांनी UPSC Civil Services Examinationमध्ये इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग हा ऐच्छिक विषय निवडला आणि इंग्रजी माध्यमातून परीक्षा दिली. २०१६च्या UPSC नागरी सेवा परीक्षेत त्यांनी अखिल भारतीय स्तरावर ५०वा क्रमांक (AIR-50) मिळवला आणि त्यांची IAS अधिकारी म्हणून निवड झाली. आज सुरभी गौतम या गुजरातमधील दाहोद जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत आहेत. सुरभी गौतम यांचा प्रवास सांगतो की परिस्थिती, ग्रामीण पार्श्वभूमी किंवा सुरुवातीच्या अडचणी यशाच्या मार्गातील अडथळे ठरू शकत नाहीत. योग्य ध्येय, सातत्यपूर्ण मेहनत आणि स्वतःच्या कमतरतेवर मात करण्याची तयारी असेल, तर मोठे यश मिळवता येते.

- बोर्ड परीक्षेत गणितात १०० पैकी १०० गुण : सुरभी लहानपणापासूनच अभ्यासात हुशार होत्या. शालेय आणि बोर्ड परीक्षांमध्ये त्या सातत्याने प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होत होत्या. मध्य प्रदेश बोर्डाच्या पाचवीच्या परीक्षेत त्यांनी गणित विषयात १०० पैकी १०० गुण मिळवले. त्यांच्या शिक्षिकेने त्यांना बोलावून त्यांचे कौतुक केले आणि भविष्यात शैक्षणिक क्षेत्रात पुढे जाण्याचा सल्ला दिला. शिक्षिकेकडून मिळालेली ही प्रशंसा सुरभी यांच्यासाठी मोठी प्रेरणा ठरली. त्यानंतर प्रत्येक परीक्षेत चांगले गुण मिळवणे हेच त्यांनी आपले ध्येय बनवले. दहावी आणि बारावीच्या बोर्ड परीक्षेतही त्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवले. या उत्कृष्ट कामगिरीमुळे त्यांना महाविद्यालयात सहज प्रवेश मिळाला.
- गावातून आलेल्या मुलीच्या इंग्रजीची उडवली खिल्ली : गावातील हिंदी माध्यमाच्या शाळेतून शिक्षण घेतलेल्या सुरभी जेव्हा शहरातील मोठ्या महाविद्यालयात दाखल झाल्या, तेव्हा इंग्रजी भाषा त्यांच्यासाठी सर्वात मोठे आव्हान ठरली. महाविद्यालयातील पहिल्याच दिवशी त्यांना इंग्रजीमध्ये स्वतःची ओळख करून देण्यास सांगण्यात आले. मात्र, त्या व्यवस्थित इंग्रजी बोलू शकल्या नाहीत. त्यामुळे काही विद्यार्थ्यांनी त्यांच्या इंग्रजीची खिल्ली उडवली. इतकेच नव्हे, तर एका शिक्षकानेही त्यांच्या क्षमतेवर प्रश्न उपस्थित केले. या प्रसंगाने खचून न जाता सुरभी यांनी आपली कमतरता दूर करण्याचा निर्धार केला. त्या दररोज इंग्रजीतील १० नवीन शब्द शिकत असत. तसेच भिंतीसमोर आणि आरशासमोर उभे राहून स्वतःशी इंग्रजीमध्ये बोलण्याचा सराव करत असत. सातत्याने केलेल्या सरावामुळे काही काळातच त्यांच्या इंग्रजी भाषेवर चांगली पकड निर्माण झाली.
- इंजिनिअरिंगनंतर UPSCसाठी सोडली TCSमधील नोकरी : सुरभी गौतम यांनी मध्य प्रदेशातील राजीव गांधी तांत्रिक विद्यापीठ (RGPV), भोपाळ येथून इलेक्ट्रॉनिक्स अँड कम्युनिकेशनमध्ये बी.ई. पदवी मिळवली. महाविद्यालयात त्या अव्वल ठरल्या आणि त्यांना चॅन्सेलर पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले. उत्कृष्ट शैक्षणिक कामगिरीच्या जोरावर इंजिनिअरिंगनंतर त्यांना IT क्षेत्रातील नामांकित कंपनी TCSमध्ये नोकरी मिळाली. मात्र, त्यांचे अंतिम ध्येय नागरी सेवेत जाण्याचे होते. त्यामुळे UPSCची तयारी करण्यासाठी त्यांनी TCSमधील नोकरी सोडण्याचा निर्णय घेतला.



- UPSC, BARC, ISRO, GATEसह अनेक परीक्षा उत्तीर्ण : अभ्यासातील प्रावीण्य आणि सातत्यपूर्ण मेहनतीमुळे सुरभी यांनी एकापाठोपाठ अनेक स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण केल्या. २०१३ मध्ये UPSC Engineering Services Examinationमध्ये त्यांनी देशात प्रथम क्रमांक (AIR-1) मिळवला. यानंतर त्यांनी MPPSC, PCS, ISRO, भाभा अणुसंशोधन केंद्र (BARC)मधील वैज्ञानिक पदाची परीक्षा, GATE, SAIL, SSC CGL, दिल्ली पोलीस उपनिरीक्षक (SI) आणि FCI यांसह अनेक स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण केल्या.

## इस्त्रोत 15 सप्टेंबरपासून भरती, 1.42 लाख रुपयांपर्यंत मासिक वेतनाची संधी

**भारतीय अंतराळ संशोधन संस्थेत (ISRO) नोकरी करण्याचे अनेकांचे स्वप्न असते. हे स्वप्न पूर्ण करण्याची संधी आता उपलब्ध झाली आहे. इस्त्रोच्या प्रोपल्शन कॉम्प्लेक्स (IPRC) मध्ये विविध पदांसाठी भरती प्रक्रिया जाहीर करण्यात आली आहे. या भरतीअंतर्गत तंत्रज्ञ, तांत्रिक सहाय्यक, स्वयंपाकी आणि अग्निशामक अशा विविध पदांवर उमेदवारांची नियुक्ती केली जाणार आहे. विशेष म्हणजे काही पदांसाठी दरमहा १ लाख ४२ हजार ४०० रुपयांपर्यंत वेतन मिळणार आहे. इस्त्रोच्या आयपीआरसी अर्थात इस्त्रो प्रोपल्शन कॉम्प्लेक्सकडून या भरतीसाठी अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली असून पात्र उमेदवारांकडून ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले आहेत. इच्छुक उमेदवारांनी पात्रता निकष तपासून अर्ज प्रक्रिया पूर्ण करावी.**

- महेंद्रगिरी येथील आयपीआरसीमध्ये भरती : या सर्व रिक्त जागा तामिळनाडूमधील महेंद्रगिरी येथे असलेल्या इस्त्रो प्रोपल्शन कॉम्प्लेक्ससाठी आहेत. इस्त्रोच्या रॉकेट आणि अंतराळयान कार्यक्रमांसाठी आवश्यक असलेल्या द्रवरूप इंधनाशी संबंधित तंत्रज्ञानावर या संस्थेत प्रामुख्याने काम केले जाते. याशिवाय रॉकेटची Propulsion System विकसित करणे, इंजिन आणि त्याच्या विविध घटकांची चाचणी घेणे तसेच नवीन तंत्रज्ञान विकसित करण्याचे कामही आयपीआरसीमध्ये केले जाते. या भरतीद्वारे याच संस्थेसाठी पात्र उमेदवारांची निवड केली जाणार आहे.
- वयोमर्यादा किती? : शैक्षणिक पात्रता, आवश्यक प्रमाणपत्रे आणि अनुभवाबरोबरच उमेदवारांची वयोमर्यादाही महत्त्वाची आहे. पद कोड ६० ते ६८ आणि ७० साठी उमेदवारांचे वय किमान १८ आणि कमाल ३५ वर्षे असावे. तर पद कोड ७१ (अग्निशामक 'ए') साठी केवळ १८ ते २५ वर्षे वयोगटातील उमेदवार अर्ज करू शकतात. वयाची गणना ५ ऑक्टोबर २०२६ या तारखेच्या आधारे केली जाणार आहे.
- निवड प्रक्रिया कशी असेल? : तांत्रिक सहाय्यक, तंत्रज्ञ 'बी' आणि स्वयंपाकी 'ए' या पदांसाठी उमेदवारांची निवड लेखी परीक्षा आणि कौशल्य चाचणीच्या आधारे केली जाणार आहे. अग्निशामक 'ए' पदासाठी लेखी परीक्षेसोबत कौशल्य चाचणी, शारीरिक दक्षता चाचणी आणि वैद्यकीय तपासणी घेतली जाणार आहे. अंतिम निवड लेखी परीक्षेतील गुणांच्या आधारे केली जाईल. ही परीक्षा ऑफलाइन ओएमआर पद्धतीने तिरुनेलवेली आणि चेन्नई येथे घेण्यात येणार आहे. अर्ज भरताना उमेदवारांना परीक्षा केंद्राची पसंती नमूद करावी लागेल.

### किती मिळणार वेतन?

या भरतीतील विविध पदांसाठी वेगवेगळे वेतनस्तर निश्चित करण्यात आले आहेत. निवड झालेल्या उमेदवारांना मूलभूत वेतनासोबत महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, वाहतूक भत्ता यांसह नियमानुसार इतर भत्तेही मिळणार आहेत.

- तांत्रिक सहाय्यक : वेतनस्तर-७ : ४४,९०० ते १,४२,४०० प्रतिमहिना
- तंत्रज्ञ 'बी': वेतनस्तर-३ : २१,७०० ते ६९,१०० प्रतिमहिना
- स्वयंपाकी 'ए': वेतनस्तर-२ : १९,९०० ते ६३,२०० प्रतिमहिना
- अग्निशामक 'ए': वेतनस्तर-२ : १९,९०० ते ६३,२०० प्रतिमहिना







### 15 सप्टेंबरपासून ऑनलाइन अर्ज

या भरतीसाठी १५ सप्टेंबर ते ५ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत केवळ ऑनलाइन पद्धतीने अर्ज करता येणार आहेत. अर्ज इस्त्रोच्या अधिकृत संकेतस्थळावरून करावा लागेल. अर्ज करण्यापूर्वी उमेदवारांनी नॅशनल करिअर सर्व्हिसेस (NCS) पोर्टलवर नोंदणी करणे आवश्यक आहे. सीव्ही, प्रत्यक्ष अर्ज, ई-मेल, बायोडाटा किंवा रिझ्युमेच्या स्वरूपात पाठविलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. या भरतीसंदर्भातील पात्रता, परीक्षा, अर्ज प्रक्रिया आणि इतर अटींबाबतची सविस्तर माहिती जाणून घेण्यासाठी उमेदवारांनी इस्त्रोच्या अधिकृत संकेतस्थळावरील भरतीची अधिसूचना काळजीपूर्वक वाचावी.

# महाराजा यशवंतराव होळकर यांचे जन्मस्थान राज्य संरक्षित स्मारक, मंत्री आशिष शेलार यांची घोषणा



**मुंबई(प्रतिनिधी)** –श्रीमंत महाराजा यशवंतराव होळकर यांच्या जन्मस्थानाचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेऊन पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील भुईकोट किल्ल्याला राज्य संरक्षित स्मारकाचा दर्जा देण्याची घोषणा सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी रविवारी केली. याबाबत सुधारित प्रस्तावाला सांस्कृतिक विभागाने मान्यता दिली असून, लवकरच शासन निर्णय जाहीर करण्यात येणार आहे.

भुईकोट किल्ल्याचा ऐतिहासिक तपशील, सीमा आणि क्षेत्रफळ आदी बाबींची पुनर्तपासणी करून सुधारित प्रस्ताव तयार करण्यात आला. या प्रस्तावाला सांस्कृतिक विभागाने मान्यता दिली आहे. राज्य संरक्षित स्मारकाचा दर्जा मिळाल्यानंतर या ऐतिहासिक वास्तूचे संरक्षण आणि संवर्धन अधिक प्रभावीपणे करता येणार आहे. श्रीमंत महाराजा यशवंतराव होळकर यांच्या जन्मस्थळाचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेऊन त्याचे जतन करणे, त्याचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणे आणि या इतिहासाची माहिती उपलब्ध करून देणे, या उद्देशाने ही कार्यवाही करण्यात आली आहे, असे शेलार यांनी सांगितले.

महाराजा यशवंतराव होळकर यांच्या पराक्रम ाचा आणि ऐतिहासिक योगदानाचा गौरव करताना त्यांच्या जन्मभूमीचे जतन होणे आवश्यक आहे. भुईकोट किल्ल्याला राज्य संरक्षित स्मारकाचा दर्जा मिळाल्याने या ऐतिहासिक वास्तूचे संरक्षण आणि संवर्धन अधिक प्रभावीपणे करता येईल, असेही शेलार यांनी स्पष्ट केले. या निर्णयामुळे महाराजा यशवंतराव होळकर यांच्या इतिहासाशी संबंधित या महत्त्वाच्या स्थळाच्या संवर्धनाला चालना मिळणार आहे. तसेच, भविष्यात या परिसराचा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा म्हणून विकास करण्यासही मदत होणार असल्याचे सांस्कृतिक विभागाकडून सांगण्यात आले.

# अँथ्रोपिक प्रमुखांची एआय मॉडेल्स विकासाचा वेग कमी करण्याचा इशारा

## ■ मानवाचे अस्तित्त्व धोक्यात येण्याची भीती

**नवीदिल्ली(वृत्तसंस्था)** – एआय कंपनी अँथ्रोपिकचे प्रमुख डारिओ अमोडेई यांनी एआय मॉडेल्सचा विकास मंदावण्याची आणि त्यावर कठोर देखरेख ठेवण्याची मागणी केली आहे. त्यांच्या 'वी मस्ट पेस द फ्रंटियर' या नवीन निबंधात, अमोडेई यांनी म्हटले आहे की, एआयचे धोके गंभीर आहेत आणि कंपन्या व सरकारांना त्यावर उपाययोजना करण्यासाठी वेळ हवा आहे. ओपनएआयचे सीईओ सॅम ऑल्टमन आणि एक्सएआयचे मालक इलॉन मस्क यांनीही या मुद्द्यावर त्यांना पाठिंबा दिला आहे. दुसरीकडे, अँथ्रोपिकमधून नुकतेच बाहेर पडलेल्या एका संशोधकाने इशारा दिला आहे की, जर विकासाचा वेग कमी केला नाही, तर पुढील दोन वर्षांत मानवाचे अस्तित्व धोक्यात येऊ शकते.

डारिओ अमोडेई यांनी त्यांच्या निबंधात असा युक्तिवाद केला आहे की, एआय मॉडेल्सच्या विकासाचा वेग कमी केला पाहिजे. त्यांनी स्पष्ट केले की ते एआय संशोधन किंवा प्रशिक्षण पूर्णपणे थांबवण्याच्या बाजूने नाहीत, तर कंपन्यांनी त्यांचे मॉडेल्स सुरक्षित आणि सुसंगत असल्याची खात्री करण्यासाठी आवश्यक वेळ घ्यावा. अमोडेई यांनी कंपन्या आणि सरकारांना सुरक्षा मानकांची पडताळणी केल्यानंतरच पुढील पावले उचलण्याचे आवाहन केले.

जेव्हा एआय मॉडेल्स विकसित केले जात असतील, तेव्हा तृतीय-पक्ष किंवा स्वतंत्र संस्थांनी त्यांच्या सुरक्षेचे मूल्यांकन केले पाहिजे. म्हणजेच, जेव्हा एखादी कंपनी नवीन एआय मॉडेल तयार करते, तेव्हा तिने तिची प्रणाली पूर्णपणे सुरक्षित आहे हे स्वतंत्रपणे ठरवू नये. त्याऐवजी, एका निष्पक्ष, बाह्य तज्ज्ञ संस्थेने एआयचे ऑडिट करावे, जेणेकरून मॉडेलमध्ये अशा कोणत्याही त्रुटी नाहीत याची खात्री करता येईल, ज्यामुळे ते सायबर हल्ल्यांना बळी पडू शकते किंवा मानवाद्वारे अनियंत्रित होऊ शकते.

एआय कंपन्यांनी स्वेच्छेने एकत्र येऊन सुरक्षा मानके निश्चित केली पाहिजेत. म्हणजेच, सरकारने लागू केलेल्या कायद्याची वाट पाहण्याऐवजी, सर्व प्रमुख एआय कंपन्यांनी एकत्र बसून हे ठरवले पाहिजे की कोणतीही कंपनी सुरक्षेशी तडजोड करणार नाही, किंवा धोकादायक मॉडेल्स बाजारात आणण्याची घाई करणार नाही.

सरकारांनी आंतरराष्ट्रीय नियम स्थापित केले पाहिजेत जेणेकरून सर्व आघाडीच्या कंपन्यांना ही मानके स्वीकारणे बंधनकारक होईल.

जर फक्त अमेरिकेने कठोर नियम लागू केले आणि चीन किंवा रशिया मनमानीपणे वागत राहिले, तर धोकादायक एआय संपूर्ण जगाला हानी पोहोचवू शकते. म्हणून, जगभरातील सरकारांनी एकत्र येऊन एक आंतरराष्ट्रीय कायदा तयार केला पाहिजे जो सर्व देशांतील एआय कंपन्यांना समान रीतीने लागू होईल. ओपनएआयचे सीईओ सॅम ऑल्टमन यांनी एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर लिहिले की ते डारिओ यांच्याशी सहमत आहेत आणि स्वतंत्र मूल्यमापनकर्त्यांची कल्पना उत्कृष्ट आहे. फॉर्च्यून मासिकाला दिलेल्या मुलाखतीत ऑल्टमन यांनी सांगितले की एआयच्या क्षमता वाढवण्यासाठी सध्याची मानके पुरेशी नाहीत. त्यांनी हे देखील मान्य केले की एआय मानवी नियंत्रणातून सुटणे पूर्णपणे शक्य आहे. अब्जाधीश एलॉन मस्क यांनीही सहमती दर्शवली आणि लिहिले की, डारिओ बरोबर आहे.

# 'एसटी'कडून ५ हजार बसेसची निविदा प्रक्रिया पूर्ण, ग्रामीण महाराष्ट्राच्या लोकवाहिनीला मिळणार नवी ताकद

**मुंबई(प्रतिनिधी)**–महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन म हामंडळाच्या (एसटी) ताफ्यात ५ हजार नव्या 'लालपरी' दाखल होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या बसेसच्या खरेदीची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून, सर्वांत कमी दराचा देकार टाटा मोटर्सने सादर केला आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी रविवारी दिली. नव्या बसेसमुळे जुन्या बसगाड्यांवरील ताण कमी होऊन ग्रामीण भागातील बस-फेऱ्या वाढविण्यास मदत होणार आहे. पुढील सहा महिन्यांत एसटीच्या ताफ्यातील सुमारे ५ हजारांहून अधिक बसेस कालबाह्य होऊन भंगारात जाणार आहेत. सध्या नाईलाजाने १२ ते १४ वर्षे जुन्या बसेसची दुरुस्ती करून त्यांचा प्रवासी सेवेसाठी वापर करावा लागत आहे. या बसेस वारंवार नादुरुस्त होत असल्याने प्रवाशांना तसेच चालकांना त्रास सहन करावा लागतो. नव्या बसेस दाखल झाल्यानंतर ही समस्या कमी होण्याची अपेक्षा आहे.

एसटीने यापूर्वीच ताफ्याच्या आधुनिकीकरणाला सुरुवात केली आहे. २ बाय २ आसन व्यवस्थेच्या २ हजार ६४० 'लालपरी' ताफ्यात दाखल झाल्या आहेत. तसेच ३ बाय २ आसन व्यवस्थेच्या ३ हजार 'राजमाता जिजाऊ' बसेस दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. आता आणखी ५ हजार बसेसची भर पडल्याने एसटीचा ताफा अधिक सक्षम होणार आहे. सध्या बसगाड्यांची कमतरता असल्याने शालेय फेऱ्या अचानक रद्द होणे, ग्रामीण भागातील मुक्कामी बसफेऱ्या उपलब्ध न होणे, अशा सम स्या निर्माण होत आहेत. नव्या बसेस ताफ्यात दाखल झाल्यानंतर 'मागेल त्याला बसफेरी' उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे सरनाईक यांनी सांगितले. मात्र,



बसफेरीची मागणी करणाऱ्यांनी संबंधित फेरी तोट्यात जाणार नाही, याची हमी घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.

५ हजार 'लालपरी'चा हा टप्पा एसटीच्या पारंपरिक डिझेल बस ताफ्याच्या विस्तारातील महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. त्यानंतर पर्यावरणपूरक ई-बसेसच्या दिशेने एसटीचा प्रवास अधिक वेगाने सुरू करण्याचे नियोजन आहे. त्यामुळे ताफ्याच्या विस्तारासोबतच आधुनिकीकरण आणि पर्यावरणपूरक वाहतुकीवरही भर दिला जाणार आहे, असे परिवहनमंत्री म्हणाले.

# मंत्रालयात श्री चक्रधर स्वामी यांचा 'अवतार दिन' साजरा

**मुंबई (प्रतिनिधी)**– महानुभाव पंथाचे प्रवर्तक भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी यांच्या अवतार दिनानिमित्त मंत्रालयात आयोजित कार्यक्रमात कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी श्रीचक्रधर स्वामी यांच्या जीवनकार्याचा गौरव केला. श्रीचक्रधर स्वामी यांच्या जीवनकार्यातून मिळालेले विचार अंगिकारण्याचे आवाहन मंत्री लोढा यांनी यावेळी केले.

श्रीचक्रधर स्वामी यांनी तत्कालीन समाजात पसरलेली अंधश्रद्धा, विषमता, कर्मकांड आणि जातीभेद यांना विरोध करुन मानवतेवर आधारित विचारांचा प्रसार केला.

श्रीचक्रधर स्वामी यांनी स्त्री-पुरुष समानता, सर्वांना शिक्षणाचा अधिकार, अहिंसा, दया, सत्य, परोपकार आणि सामाजिक समरसता यांचा संदेश दिला. त्यांच्या शिकवणीतून मानवाने सदाचार, विवेक आणि मानवकल्याणाचा मार्ग स्वीकारावा, असा संदेश मिळत असल्याचे मंत्री लोढा यांनी सांगितले.

'लीळाचरित्र' हा मराठी भाषेतील आद्यचरित्रग्रंथ त्यांच्या कार्याचा महत्वपूर्ण वारसा मानला जातो. श्रीचक्रधर स्वामींच्या अवतार दिनाचे औचित्य साधून समाजात बंधुभाव, नैतिक मूल्ये आणि सामाजिक एकता अधिक बळकट करण्याचे आवाहन यावेळी मंत्री लोढा यांनी केले.

या कार्यक्रमास सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव रामदास कोळेकर, प्रदिप कोपार्डे, दत्तात्रय शिंदे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# भगवान सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिवादन



**मुंबई(प्रतिनिधी)**–भगवान श्री चक्रधर स्वामी यांना त्यांच्या अवतार दिनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे अभिवादन केले.

वर्षा शासकीय निवासस्थानी मुख्यमंत्री फडणवीस यांनी भगवान सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

याप्रसंगी उपस्थित मान्यवर, अधिकारी आदींनीही भगवान श्री चक्रधर स्वामी यांना अभिवादन केले.

# महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेला उत्स्फुर्त प्रतिसाद

**मुंबई(प्रतिनिधी)**–महाराष्ट्र शासनाच्या पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, सांस्कृतिक कार्य विभागाकडून आयोजित करण्यात आलेल्या 'महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२६' साठी महाराष्ट्रभरातून ४३२ मंडळांनी अर्ज सादर केले आहेत. यात ठाणे जिल्ह्याचे सर्वाधिक ५२ अर्ज प्राप्त झाले आहेत. या स्पर्धेचा विस्तार मागील वर्षीपासून तालुकास्तरापर्यंत करण्यात आला होता.

यावर्षीपासून प्रथमच ही स्पर्धा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील विस्तारित करण्यात आली आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेचे अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख २५ सप्टेंबर आहे. अर्ज सादर करताना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय मंडळांनी गेल्या वर्षभरातील आयोजित केलेल्या गणेशोत्सव व संबंधित सांस्कृतिक उपक्रमांची तसेच यावर्षीच्या गणेशोत्सवाची छायाचित्रे जिओ टॅग फोटोसहीत सादर करावयाची आहेत. आतापर्यंत राष्ट्रीय स्तरासाठी देशभरातील विविध शहरांतून अर्ज प्राप्त झाले आहेत. तर आंतरराष्ट्रीय स्तरासाठी जपान, श्रीलंका, जर्मनी, नायजेरिया, सिंगापूर इ. देशांतून अर्ज प्राप्त झाले असून, या स्पर्धेचा जागतिक विस्तार या राज्य महोत्सवाला 'ग्लोबल' ओळख मिळवून देताना दिसतो आहे.



सार्वजनिक गणेशोत्सवाचे पारंपरिक व सांस्कृतिक महत्त्व ओळखून शासनाकडून गणेशोत्सवाला 'राज्य म होत्सव' म्हणू घोषित करण्यात आले आहे. मागील वर्षी या स्पर्धा व संबंधित अन्य उपक्रम यांच्या आयोजनात व्यापक बदल करण्यात आले असून वर्षागणिक मंडळांचा व नोंदणीकृत संस्थांचा या स्पर्धेतील सहभाग वाढत आहे. स्पर्धेचे परीक्षण अत्यंत पारदर्शक पद्धतीने करण्यात येते. सहभागी मंडळांना तालुकास्तरावरील व जिल्हास्तरावरील परीक्षण समिती प्रत्यक्ष भेट देणार असून, भेटीदरम्यान सहभागी मंडळांची सर्व कागदपत्रे, वर्षभरात राबविलेले उपक्रम, त्यांचे अहवाल, फोटो व व्हिडिओ तसेच सांस्कृतिक स्पर्धा, संस्कृती व सांस्कृतिक वारशाचे जतन व संवर्धन विषयक उपक्रम, भाविकांसाठी केलेल्या सोयी सुविधा, विविध स्पर्धा, विद्यार्थी महिला व ज्येष्ठ नागरिक यांसाठीचे कायम स्वरूपी व उत्सव काळातील उपक्रम, पर्यावरण पूरक मूर्ती व सजावट, प्रदूषणरहित वातावरण इ. विविध बाबींच्या आधारे परीक्षण करण्यात येणार आहे. हे परीक्षण ऑनलाईन स्वरूपातील असल्याने परीक्षकांना जिओ टॅग फोटो द्वारे आपला निकाल सादर करावयाचा आहे. यामुळे निकालात पारदर्शकता निर्माण होऊन स्पर्धेचे नियमन व नियंत्रण अधिक प्रभावीपणे करता येते.

तालुकास्तरीय प्रथम विजेत्याला २५ हजार, जिल्हास्तरीय विजेत्यांना अनुक्रमे ५० हजार ४० हजार व ३० हजार रकमेची पारितोषिके देण्यात येणार असून व राज्यस्तरीय तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रथम तीन विजेत्यांना ७.५ लाख, ५ लाख, २.५ लाखांची पारितोषिकांची घोषणा करण्यात आली आहे. तसेच घरगुती व सार्वजनिक गणपतीचे दर्शन घरबसल्या ऑनलाईन पद्धतीने सर्वांना होण्यासाठी तयार करण्यात आलेले https://ganeshotsav.pldmka.co.in हे पोर्टल १४ सप्टेंबरपासून खुले होणार आहे. यावर सार्वजनिक मंडळे आपल्या गणपतीचे थेट मोफत दर्शन जगभरातील गणेशभक्तांसाठी उपलब्ध करून देऊ शकतात, तसेच घरगुती गणपतीची छायाचित्रेदेखील सर्वांना पाहण्यासाठी उपलब्ध करून देऊ शकतात. या राज्य महोत्सवातील सर्व उपक्रमांमध्ये मंडळांनी व नागरिकांनी उत्स्फुर्तपणे सहभाग घ्यावा, असे आवाहन राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केले आहे

# केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे मुंबई विमानतळावर स्वागत



**मुंबई(प्रतिनिधी)**– केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांचे आज पहाटे छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई येथे आगमन झाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचे स्वागत केले.

कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, सांस्कृतिक कार्यमंत्री ड. आशिष शेलार, आमदार रवींद्र चव्हाण, आमदार अमित साटम, मुंबईच्या महापौर श्रीमती रितू तावडे, गृह विभागाच्या अप्पर मुख्य सचिव मनिषा म्हैसकर, मुंबई पोलिस आयुक्त देवेन भारती, राजशिष्टाचार विभागाचे उपसचिव चंद्रकांत मोरे यांनीही याप्रसंगी केंद्रिय मंत्री शाह यांचे स्वागत केले.

## जाहीर प्रगटन

हिमायतनगर येथील दिवाणी न्यायाधिश के स्तर, यांचे न्यायालयात हिमायतनगर जि. नांदेड किरकोळ अर्ज क्र. आर. जे.ई. १०४/२०२६

अर्जदार (१)–शांताबाई . दत्ता उर्फ दत्तराम भंडारे, वय ७० वर्षे, धंदा शेती, २) प्रकाश पि. दत्ता उर्फ दत्तराम भंडारे, वय ५० वर्षे, धंदा शेती, ३) संदीप पि. दत्ता उर्फ दत्तराम भंडारे, वय ४५ वर्षे, धंदा शेती, १ ते ३ रा. मोरगांव, ता. हिमायतनगर जि. नांदेड ४) शोभाताई भ्र. विठ्ठलराव कवाणे, वय ४७ वर्षे, धंदा घरकाम, रा. येहळेगांव तु., ता. येहळेगांव जि. हिंगोली ५) रेखा भ्र. बालाजी शिरगीरे, वय ४० वर्षे, धंदा घरकाम, रा. भिसी, ता. किनवट जि. नांदेड

विरुद्ध

गैरअर्जदार – निरंक

कलम ३ मुंबई रेगुलेशन ८, १८२७ कायद्यानुसार मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात अर्ज सादर केला असुन त्यात असे कथन केले आहे की, दत्ता उर्फ दत्तराम पि. उकंडजी भंडारे, यांचा मृत्यु दिनांक १५/०८/२०२१ रोजी मोरगांव ता. हिमायतनगर येथे मयत झाले आहेत. दत्ता उर्फ दत्तराम पि. उकंडजी भंडारे हे रा. मोरगांव, ता. हिमायतनगर जि. नांदेड येथिल रहिवाशी होते. मयतांच्या पश्चात अर्जदार हे सध्या वरील ठिकाणचे रहिवासी आहे. त्यांनी कायदेशीर वारस म्हणुन वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदार हयांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी उपरोक्त प्रकरणी सर्व संबधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदार हयांचे नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरुपात स्वतः हजर राहुन अथवा त्यांचे विधीज्ञ मार्फत ३० दिवसाच्या आत या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही काही आक्षेप / उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील.

आज दिनांक ११/०९/२०२६ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्याने देण्यात आले.

आदेशावरून

क. लिपीक, दिवाणी न्यायालय, क. स्तर, हिमायतनगर

सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, क. स्तर, हिमायतनगर

## कागदपत्रं हरवले

माझी ऋषिकेश संभाजी वडवळे या नावाची इयत्ता दहावी पासची टी. सी. व अन्य शैक्षणिक कागदपत्रे कापसी (बु) ते नांदेड दरम्यान प्रवासात हरवले आहेत. कोणास सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा. **संपर्क पत्ता**– संभाजी अंताजी वडवळे मु. पो. कापसी (बु) ता. लोहा, जि. नांदेड. मो. क्र. ७६२०६१६६५८, ९०४९५१४७५८.


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा

डॉग डिलर

मोबाईल नंबर

९८५०६८८५२८




## मंथनपार्क सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. नांदेड ता. जि. नांदेड

**नोंदणी क्रमांक**-NND/NND/HSG/TO/464/2004 दि. 29/01/2004

दिनांक : १२/०९/२०२६

### वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

### फक्त, सभासदासाठी

मा. श्री............................................................

मंथन पार्क सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या नादेड च्या सन्माननीय सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची वार्षीक सर्वसाधारण सभा दिनांक ३०/०९/२०२६ रोज बुधवार दुपारी ०१.०० वाजता संस्थेचे कार्यालयात / संस्थेचे अध्यक्ष श्री. ज्योतीबा जयराम खराटे यांच्या अध्यक्षते खाली खालील विषयावर चर्चा करुन निर्णय घेण्यासाठी सभा बोलविण्यात आली आहे.

तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे हि विनंती.

(कोंडलवार गोविंद बाबागौड)
सचिव

विषय सुची :

१. मागील वार्षिक सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे बाबत.
२. दि. ०१/०४/२०२५ ते दि. ३१/०३/२०२६ अखेर वार्षिक जमा खर्च, तेरीज पत्रकास मान्यता देणे.
३. संस्थेच्या हितास व कार्यालय बाधा आणणाऱ्या सभासदावर नियमानुसार कार्यवाही करण्याचा निर्णय घेणे बाबत.
४. संस्थेचे वार्षिक वर्षाचे लेखा परिक्षण करीता लेखा परिक्षकांची नेमणुक करणे.
५. संस्थेच्या भाग्यश्री बिल्डींग या ईमारतीमधील फ्लॅट क्रं. ५०३ जप्त केलेल्या फ्लॅटची लीलाव प्रक्रियेस मान्यता घेणे.
६. अध्यक्षाच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करुन ठराव घेणे बाबत.

टिप : उपविधी प्रमाणे गणपुर्ती न झाल्यास त्याच दिवशी त्याचा ठिकाणी एक तास सभा तहकुब करुन सभा घेण्यात येईल त्यास गणपुर्तीची आवश्यकता असणार नाही.

## सचखंड बोर्ड कर्मचारी सहकारी पत संस्था म. नांदेड

## SHORT TENDERS NOTICE

सर्व व्यापारी बंधूंना सूचित करण्यात येते की, सचखंड बोर्ड कर्मचारी सहकारी पतसंस्था म. नांदेडसाठी खालील शैक्षणिक साहित्य खरेदी करावयाचे आहे.

इच्छुक, पात्र व अनुभवी उत्पादक/पुरवठादारांकडून सीलबंद लिफास्यात दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | वस्तू | नग |
|---|---|---|
| 1) | School Bags<br>Specification<br>Size 13 x 18 Cutting Backpack<br>with Laptop Compartiment Inside<br>Lining 1000D Waterproof Fabric,<br>8 No. Heavy Duty Chain | 600 |
| 2) | Note Books<br>Specification Size 18 24 CM..58 $GSM^2$<br>Balanger Paper, 144 Pages. Red Black<br>Lining. 280 $GSM^2$ WB Cover, 4 Colour<br>Cover Design with Single Side<br>Lamination Centre Pin Binding. | 9000 |

1. Notebook (9000 Nos.) व 2. School Bag (600 Nos.). दोन्ही वस्तूंचा दर्जा व नमुना (Sample) संस्थेच्या मान्य Specification प्रमाणे असणे आवश्यक असून, पुरवठादाराने नमुना सादर करणे व मंजूर नमुन्याप्रमाणेच १० दिवसांच्या आत मालाचा पुरवठा करणे बंधनकारक राहील. दरपत्रकात प्रति नग दर प्रमाणे एकूण नाग संख्येची एकूण किंमत, GST व इतर सर्व करांसह वाहतूक व डोर डिलिव्हरी खर्चाचा समावेश करून अंतिम दर स्पष्टपणे लिहावेत.

निवड झालेल्या पुरवठादाराने मंजूर नमुन्याप्रमाणेच संपूर्ण माल १० दिवसांत पुरवणे बंधनकारक राहील. गुणवत्ता किंवा specification मध्ये फरक आढळल्यास माल नाकारण्याचा अधिकार संस्थेकडे राहील.

दरपत्रक बंद लिफाफ्यात Note Books - 9000 Nos. / School Bag - 600 Nos. दरपत्रक असा उल्लेख करून दि. १७/०९/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत संस्थेच्या कार्यालयात सहेलीसिंग मार्केट, गुरुद्वारा चौरस्ता, नांदड – ४३१६०१ सादर करावे.

गुणवत्ता, दर व इतर अटींनुसार कोणतेही दरपत्रक स्वीकारण्याचा. नाकारण्याचा वा रद्द करण्याचा अंतिम अधिकार संस्थेकडे राहील.

**सचिव,**
**सचखंड बोर्ड कर्मचारी सहकारी पतसंस्था म. नांदेड.**

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



# महापालिकेकडून विसर्जन घाटांची प्रत्यक्ष पाहणी

## महापौर व आयुक्तांचा संयुक्त पाहणी दौरा



**नांदेड (प्रतिनिधी)–** आगामी गणेशोत्सव व श्री विसर्जन सोहळा सुरक्षित आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेच्या महापौर कविता मुळे आणि मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी संयुक्तपणे शहरातील प्रमुख ५ विसर्जन स्थळांची प्रत्यक्ष पाहणी करून आढावा घेतला. या दौऱ्यात उपमहापौर दीपकसिंह रावत, महिला बाल कल्याण सभापती सदिच्छा सोनी पाटील यांच्यासह मनपाचे इतर वरिष्ठ अधिकारी व विभाग प्रमुख उपस्थित होते.

यावर्षी कमी पाऊस झाल्यामुळे नदी पात्रात पाण्याची पातळी कमी असल्याने, नागरिकांनी व गणेश मंडळांनी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. या पाहणी दौऱ्यादरम्यान महापौर आणि आयुक्त यांनी एकूण ५ प्रमुख स्थळांना भेटी देऊन आवश्यक त्या सुधारणा व व्यवस्थेचे निर्देश दिले. आसना नदी परिसर (पासदगाव व सांगवी) या दोन्ही ठिकाणी कृत्रिम तलावांमध्ये मूर्ती विसर्जन करण्यासंबंधीच्या कामांचा विशेष आढावा घेण्यात आला. पर्यावरणपूरक विसर्जनासाठी कृत्रिम तलावांची निर्मिती आणि तेथील सोयीसुविधा वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्याचप्रमाणे पुयनी व झरी खदान परिसर या दोन्ही खदान परिसरात मोठ्या आकाराच्या गणेश मूर्तींच्या विसर्जनाबाबतच्या नियोजनाचा आढावा घेण्यात आला. मोठ्या मूर्तींचे विसर्जन सुरक्षितपणे व्हावे यासाठी रॅम्प, क्रेन आणि पुरेशी प्रकाश व्यवस्था करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच गोदावरी नदीच्या मुख्य नावघाट विसर्जन स्थळाला भेट देऊन तेथील घाटांची स्वच्छता, डागडुजी आणि मार्गांच्या दुरुस्तीची पाहणी करण्यात आली.

पाहणी दरम्यान विसर्जनाच्या दिवशी कोणतीही आणीबाणीची परिस्थिती हाताळण्यासाठी अग्निशामक दल आणि वैद्यकीय पथके पूर्णपणे सुसज्ज ठेवण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. सर्व घाटांवर जीवरक्षक आणि रुग्णवाहिका तैनात राहतील. विसर्जनाच्या दिवशी नागरिकांना व भाविकांना कोणताही त्रास होणार नाही, यादृष्टीने पाणी, तात्पुरते मंडप, बॅरिकेडिंग आणि विद्युत व्यवस्था यांसारख्या सर्व आवश्यक उपाययोजना तातडीने पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले.

श्री गणेश उत्सवातील विसर्जन सोहळा हा आनंदाचा उत्सव आहे. त्यामुळे घाटांवर व खदान परिसरात विनाकारण गर्दी न करता प्रशासनाने दिलेल्या सुरक्षिततेच्या सूचनांचे काटेकोर पालन करावे. महापालिकेचे अधिकारी आणि पोलीस प्रशासनासोबत समन्वय ठेवून विसर्जन सोहळा शांततेत पार पाडण्यास मदत करावी असे आवाहन महापौर कविता संतोष मुळे यांनी केले आहे.

यावर्षी कमी पर्जन्यमानामुळे नदी पात्रात पाण्याची पातळी अत्यंत कमी आहे. ही बाब लक्षात घेऊन सर्व गणेश मंडळे आणि घरगुती गणपती विसर्जन करणाऱ्या नागरिकांनी महापालिकेच्या यंत्रणेला व कृत्रिम तलावांच्या वापराला पूर्ण सहकार्य करावे, असे आवाहन मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी केले आहे.

# महाराष्ट्र विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरूपदी निवड झाल्याबद्दल डॉ. व्यंकट गिते यांचा सत्कार



**कंधार (प्रतिनिधी)–** कंधार तालुक्यातील संगमवाडी येथील रहिवासी डॉ. व्यंकट गिते यांची महाराष्ट्र विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरूपदी निवड झाली आहे. या निवडीबद्दल त्यांच्या चाहत्यांनी सत्कार केला.

डॉ. गिते यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण पूर्ण करून त्यांनी वैद्यकीय क्षेत्रात आपले स्थान निर्माण केले. त्यांनी बुद्धीमतेच्या जोरावर प्राध्यापक, संशोधक व मार्गदर्शक म्हणून उल्लेखनीय योगदान दिले आहे.

वैद्यकीय शिक्षण आणि संशोधनाबरोबरच त्यांनी ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी नेहमीच मदतीचा हात दिला. त्यांच्या कार्यातून अनेक विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळाली आहे. आई-वडिलांचे संस्कार, शिक्षणाची प्रबळ जिद्द आणि समाजासाठी काहीतरी करण्याची तळमळ या गुणांच्या जोरावर त्यांनी हे यश संपादन केले असल्याचे त्यांच्या चाहत्यांनी प्रतिक्रिया व्यक्त करताना सांगितले.

महाराष्ट्र विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरूपदी त्यांची निवड झाल्याबद्दल संगमवाडी गावातील ग्रामस्थ, कर्मचारी बांधव व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचा सत्कार करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याची विटंबना करणाऱ्या समाजकंटास अटक करा -सचिन साठे



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** सिडको येथील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास सचिन साठे यांनी भेट देऊन नुकत्याच घडलेल्या घटनेचा निषेध व्यक्त केला. साठे यांच्या पुतळ्याची विटंबना करणाऱ्या दोषींना तत्काळ अटक करा, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली.

यावेळी अण्णा भाऊ साठे यांच्या सून सावित्रीमाई साठे यांची प्रमुख उपस्थिती होती. १३ सप्टेंबर रोजी नांदेड येथे आयोजित मोर्चास आलेले अण्णा भाऊ साठे यांचे नातू सचिन साठे, नात जावई गणेश भगत यांनी सिडको येथील साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे स्मारकाला भेट देऊन समाजबांधव व पदाधिकारी यांच्याशी चर्चा केली. यावेळी प्रभाग क्रमांक २० भाजपचे नगरसेवक संजय पाटील घोगरे, नगरसेवक उदय देशमुख, सार्वजनिक जयंती महोत्सव सिडकोचे अध्यक्ष अंकुश गायकवाड, सचिव पप्पू गायकवाड, उद्योजक माधव डोम्पले, दलित मित्र माधव आंबटवार, नारायण कोलंबीकर, आर. जे. वाघमारे, जनार्दन गुपीले, उत्तम घोडजकर, आनंदा गायकवाड, मरीबा बसवंते, शंकर धिरडीकर, आनंदा वाघमारे, दया वाघमारे, नवनाथ कांबळे, चंद्रकांत मेकाले, सुरेश कांबळे, ज्ञानेश्वर ढाकणीकर, नितीन वाघमारे यांच्यासह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी समाजात फुट पाडून तेढ निर्माण करण्यासाठी अज्ञात समाजकंटकांनी हे कटकारस्थान केले असून संबंधित आरोपीला पोलीस प्रशासनाने तत्काळ अटक करावी, अशी मागणी सचिन साठे यांनी केली आहे.

# सायाळ येथे मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाच्या समर्थनार्थ पाण्याच्या टाकीवर चढून शोले स्टाईल आंदोलन



**लोहा (प्रतिनिधी)–** अंतरवाली सराटी येथे मराठा योध्दा मनोज पाटील जरांगे हे गेल्या १४ दिवसांपासून मराठा आरक्षणासाठी आमरण उपोषणाला बसले आहेत. शासनाने त्यांच्या आंदोलनाची अद्यापपर्यंत दखल घेतली नाही. त्याच्या निषेधार्थ नांदेड जिल्ह्यातील सायाळ येथे सकल मराठा समाजाच्यावतीने शासनाचे लक्ष वेधण्यासाठी पाण्याच्या टाकीवर चढून शोले स्टाईल आंदोलन केले व लोहा तहसीलदार यांना निवेदन दिले.

या निवेदनात असे नमूद केले की, मराठा समाजाच्या मागण्यांसाठी मनोज जरांगे यांना पाठिंबा म्हणून सकल मराठा समाज सायाळच्या वतीने आंदोलन करीत आहोत. सरकारने या आंदोलनाची दखल घ्यावी अन्यथा सकल मराठा समाजाच्या वतीने आणखी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला.

यावेळी छावा युवा संघटनेचे जिल्हाध्यक्ष माऊली पाटील पवार, सरपंच अण्णासाहेब पाटील पवार, परमेश्वर पवार, संतोष पवार, परमेश्वर मोरतळे, प्रल्हाद पवार, अनिल पवार, संदिप पवार, आदिनाथ पवार, दत्ता ढगे, साईनाथ पवार, मारोती ढगे यांच्यासह सकल मराठा समाजबांधव उपस्थित होता.

# सौ. मंदाकिनी होणगुंटे यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)–**बजरंग कॉलनी, सांगवी येथील रहिवासी सौ.



मंदाकिनी शिवशंकर होणगुंटे होकर्णेकर यांचे उपचारादरम्यान रविवारी पहाटे निधन झाले. मृत्यूसमयी त्या ३८ वर्षांच्या होत्या.

सौ. मंदाकिनी होणगुंटे यांच्या पार्थिवावर सांगवी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई -वडील, सासू-सासरे, पती, २ मुले असा परिवार आहे. गुंडाप्पा होणगुंटे होकर्णेकर यांच्या त्या स्नुषा होत.

# लोह्यात सिने अभिनेत्री हिना पांचाळ व सुरभी हांडे यांच्या उपस्थितीत दहीहंडीचा थरार



**लोहा (प्रतिनिधी)–** लोहा शहरात गोकुळाष्टमीनिमित्त शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर रोजी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वाखाली व सिने अभिनेत्री हिना पांचाळ व सुरभी हांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत दहीहंडी महोत्सव उत्साहात पार पडला.

या दहीहंडी स्पर्धेत लोहा, कंधार, गंगाखेड आदी भागातील गोविंदा पथकांनी स्पर्धेत सहभाग नोंदविला. यावेळी दहीहंडी स्पर्धा अत्यंत अटीतटीची, निःपक्षपाती व पारदर्शकपणे पार पडली. प्रथम दहीहंडी गंगाखेडच्या गोविंदा पथकाने फोडून प्रथम ७१११११ रुपयांचे पारितोषिक पटकावले तर दुसऱ्यांदा लोहा येथील जय बजरंग ९५१५ या गोविंदा पथकांनी दहीहंडी फोडून द्वितीय पारितोषिक ५११११ रुपये पटकावले.

यावेळी युवानेते प्रवीण पाटील चिखलीकर, सामाजिक कार्यकर्त्या तथा भाजपाच्या मराठवाडा महिला प्रमुख, नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालिका सौ. प्रणिताताई देवरे -चिखलीकर, सचिन पाटील चिखलीकर, लोहा न. प. चे नगराध्यक्ष शरद पाटील पवार, उपाध्यक्ष करीम शेख मुजावर, माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेवक केशवराव मुकदम, नगरसेवक हरीभाऊ चव्हाण, नगरसेवक प्र. रावसाब मंजलवाड, नारायण येलरवाड, सामाजिक कार्यकर्ते सुधाकर पाटील पवार, मोगू पाटील पवार, सचिन मुकादम, दीपक पाटील कानवटे, संतोष पाटील पवार, हनमंत पाटील पवार, गंगाधर पाटील गवते, बंटी देशमाने आदी उपस्थित होते.

तसेच यावेळी सिने अभिनेत्री हिना पांचाळ व सुरभी हांडे या अभिनेत्रींच्या नृत्यावर तरुणाई थिरकली.

यावेळी बोलताना आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी लोहा येथील दहीहंडी महोत्सवाच्या आयोजकांच्या नियोजनाबद्दल प्रशंसा केली.

## इकडचं तिकडचं

# हियाँ कोई भुखा नहीं न मरता...

नांदेड शहरातील एका रस्त्याच्या कामाजवळ काही मजूर रिमझिम बरसणारा पाऊस उघडण्याची आतुरतेने वाट पाहत उभे होते. पाऊस उघडण्याची वाट पाहत मीही त्यांच्याजवळ उभा होतो. बहुतांश मजूर उत्तर प्रदेश आणि बिहारमधून आलेले होते. पावसाच्या सरींसोबत त्यांच्या गप्पाही रंगल्या होत्या. त्यांच्यापैकी एकजण मनातलं बोलून गेला, ''अपने हियाँ काम होता तो पेट भरने घरसे इतनी दूर काहे आते? अपने कुछ लोग बंबई में गलत काम किए भी होंगे, ससुरा ऊं लोग सारा युपी, बिहार बदनाम कर दिए है. पर महाराष्ट्र बहुत अच्छा है, सबका पेट तो पाल रहा है. नांदेड में पाच बरस से रह रहे हैं, आजतक कभी कौनो तकलिफ नहीं न हुई हैं.''

त्याच्या या वाक्यात महाराष्ट्राबद्दल मनापासूनची कृतज्ञता होती. तेवढ्यात दुसरा बिहारी मजूर बोलू लागला, ''अरे बाबूजी, इतनी जगह रोड, बिजली के खंबे, बिल्डिंग और ब्रिजवा का काम शुरु हैं उंहा जरा ध्यान से देखिएगा ना, तो आधे से ज्यादा मजदूर आपको बिहारी और युपी का भईय्या लोग मिलेगा. हम लोग हियाँ से सिर्फ छट के लिये अपने गांव चले जाते है ना, तो काम का स्पिड आधा होता हैं, यह ठेकेदार कहता है. किसी का हक नहीं छिनते साहाब, हियाँ सरकार सबन को बहुत कुछ मुफ्त में जो बाटता हैं ना, इसके चलते हियाँ के लोगन को काम का जरुरते ना है. इसलिए हमको काम मिल जाता हैं.''

तेवढ्यात आणखी एकाने आपल्या शिक्षणव्यवस्थेपासून गावाकडच्या मानसिकतेपर्यंतचं वास्तव काहीशा उपरोधिक, पण तितक्याच वेदनादायी शब्दांत मांडलं, ''हमरे हियाँ पढाई बडी अच्छी है, पर ससुरा ज्यादातर बच्चालोग पढना ही नहीं चाहता. जो बिहारी पढता है वह डीएम या डीएसपी बनके महाराष्ट्र में आता है और हम जैसन लोग मजदूरी करने के लिये भी महाराष्ट्र में ही आते हैं.''

तेवढ्यात पाऊस जरासा कमी झाला. गप्पांचा ओघ थांबला आणि त्यांच्या हातांची लगबग सुरू झाली. ''अरे चला हो बनवारी, काम पर लग जावा, निपटाईके घर चला भईय्या.''

मी मात्र तिथेच काही क्षण उभा राहिलो. काहीतरी मनात खोलवर रुजत होते. आपण अनेकदा ऐकतो, आपला भाग मागास आहे, इथे रोजगार नाही, इथे संधी नाहीत. आपल्या परिसरातील उणिवांवर प्रश्न उपस्थित करणे चुकीचे नाही. उलट, विकासासाठी प्रश्न विचारलेच पाहिजेत. पण प्रश्न विचारताना आपल्या आजूबाजूला उभ्या असलेल्या वास्तवाकडे डोळे उघडे ठेवून पाहणेही तितकेच गरजेचे आहे. ज्या उत्तर प्रदेश-बिहारमधून रोजगाराच्या शोधात हजारो किलोमीटर दूर आलेला हा मजूर महाराष्ट्राला सबका पेट पाल रहा है असे म्हणतो, त्या वाक्याची किंमत मोठी आहे. कारण हे वाक्य एखाद्या राजकीय मंचावरच्या नेत्याने म्हटलेले नाही. ते एका कष्टकरी, गरीब मजुराच्या तोंडून आले आहे. आपण कधी कधी आपल्या गावाच्या, शहराच्या किंवा राज्याच्या उणिवा इतक्या मोठ्या करून पाहतो की, आपल्या डोळ्यांसमोर असलेली प्रगतीच दिसेनाशी होते. 'गावचा तो जोगडा अन् परगावचा तो महाराज!' नांदेडच्या रस्त्यावर त्या दिवशी पावसाची वाट पाहणाऱ्या त्या मजुरांनी मात्र मला महाराष्ट्राकडे नव्या नजरेने पाहायला शिकवले. कदाचित विकासाच्या मोठमोठ्या आकडेवारीपेक्षा त्या मजुराचे एक वाक्य अधिक प्रभावी होते, ''महाराष्ट्र बहुत अच्छा है, सबका पेट तो पाल रहा है. हियाँ कौनो भुखा नहीं न मरता साहेब!'' आणि मनात एक विचार नकळत उमटला, आपण आपल्या भूमीच्या उणिवांवर नाराज होण्यापूर्वी, तिच्या सामर्थ्याची जाणीव करून घेण्यासाठी कधीतरी अशा परप्रांतीय कष्टकऱ्यांच्या डोळ्यांतून महाराष्ट्राकडे पाहायला हवे. कारण ते इथे केवळ मजुरी करायला आलेले नाहीत. ते आपल्या महाराष्ट्राच्या विकासकथेतील न बोललेले, पण अत्यंत महत्त्वाचे शब्द आहेत, आणि म्हणूनच त्या दिवशी मनात एकच प्रश्न घुमत राहिला 'हम चले गये तो?' आपल्या शहरातील हे रस्ते, या इमारती, हे पूल, ही विकासाची चाकं, कदाचित काहीच थांबणार देखील नाही. पण त्याहून मोठा प्रश्न आहे की; आपल्या श्रमाची, माणुसकीची आणि परस्परावलंबित्वाची जाणीव घेऊन आपण पुढे कधी चालणार?

**शिवाजीराजे पाटील बाभळीकर**

# वृत्तपत्र विक्रेत्यांचे ९ ऑक्टोबरला राज्यभर मोर्चे

## कल्याणकारी मंडळासाठी राज्य संघटनेची आंदोलनाची हाक



**सोलापूर/नांदेड(प्रतिनिधी)** –स्वतंत्र वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी मंडळाच्या अंमलबजावणीसाठी ९ ऑक्टोबरला राज्यात सर्व जिल्हाधिकारी कार्यालयावर परिवारासह मोर्चा काढण्याचा निर्धार महाराष्ट्र राज्य विक्रेता संघटनेच्या कार्यकारिणी बैठकीत करण्यात आला. राज्य संघटनेचे अध्यक्ष सुनिल पाटणकर यांच्या अध्यक्षतेखाली व कार्याध्यक्ष बालाजी पवार, सरचिटणीस विकास सूर्यवंशी यांच्या प्रमुख उपस्थितीत सोलापूर येथे झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेची राज्य कार्यकारिणीची बैठक समृद्धी गार्डन सोलापूर येथे शनिवारी पार पडली. संघटनेचे अध्यक्ष पाटणकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करुन बैठकीस सुरवात झाली. स्वागत राज्य संघटनेचे कार्यकारिणी सदस्य गोरख भिलारे यांनी केले. सरचिटणीस विकास सूर्यवंशी यांनी प्रास्ताविक करून बैठकीस सुरवात केली.

संघटनेचे अध्यक्ष सुनील पाटणकर म्हणाले, गेली अनेक वर्षे संघटनेच्या माध्यमातून वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी स्वतंत्र कल्याणकारी मंडळासाठी संघटना प्रयत्न करत आहे. अनेक निवेदने, आंदोलने, बैठका झाल्या. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दोन वर्षापूर्वी स्वतंत्र कल्याणकारी मंडळाची घोषणा केली. मात्र अद्याप अंमलबजावणी झालेली नाही. या कल्याणकारी मंडळाची अंमलबजावणी व्हावी यासाठी आता रस्त्यावरची लढाई करावी लागेल. उपस्थित सर्व पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्यांच्या चर्चेनंतर पाटणकर यांनी आंदोलनाची घोषणा केली.

कार्याध्यक्ष बालाजी पवार म्हणाले, अनेक वेळा मागणी करुनही कल्याणकारी मंडळाची अंमलबजावणी केली जात नाही. याबाबत सरकारला रस्त्यावर उतरुन जाब विचारावा लागेल. संघटना ज्या सुचना करेल, आंदोलन देईल त्याची अंमलबजावणी करावी. प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयावर, तहसीलदार कार्यालयासमोर आंदोलन करावे.

सरचिटणीस विकास सूर्यवंशी यांनी सांगितले की, राज्य संघटनेने घेतलेल्या ९ ऑक्टोबरच्या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. प्रत्येक तालुका व जिल्हा पातळीवर हे आंदोलन करावे. संघटनेचे उपाध्यक्ष रघुनाथ कांबळे कोल्हापूर, गोरख भिलारे पंढरपूर, दीपक वाघमारे सांगली आदींनी या चर्चेत सहभाग घेतला.

राज्य संघटनेच्या स्वावलंबी कल्याणकारी कोषबाबत या बैठकीत चर्चा करण्यात आली. पाटणकर यांनी सविस्तर माहिती दिली. संघटनेचे सरचिटणीस विकास सूर्यवंशी यांनी राज्य संघटनेच्या माध्यमातून विविध मार्गाने या कल्याणकारी कोषमध्ये निधीची भर घालण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले. विनोद पन्नासे, नरहरी लिंगायत, गोरख भिलारे, दिनेश उके आदींनी या विषयावरील चर्चेत भाग घेतला.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४

ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com